अंक ३ रा ]

[ वर्ष २७ वें.

# " श्री साईलीला "

त्रैमासिक




जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर १९५०

वार्षिक वर्गणी रु. २-४-०

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २७ ] त्रैमासिक–जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर १९५० [ अंक ७ वा

## —ः संपादकीय ः—

आवडीनें भावें हरि–नाम घेसी ।
तुझी चिंता त्यासी सर्व आहे ।
नको खेद धरूं कोणत्या गोष्टीचा ।
पति तो लक्ष्मीचा जाणतसे ।
जैसी स्थिती आहे तैशापरी राहें ।
कौतुक तूं पाहे संचिताचें ।
एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा ।
हरिकृपें त्याचा नाश झाला ।

कालियुगांत, कलीचें प्राबल्य जास्त असल्यामुळें मानव देहाला संतांनीं नामस्मरणाचा आणि तें 'हरिनाम–साईनाम'–असा साधा, सरळ, सहज, सोपा आणि अनुभवसिद्ध मार्ग सांगितला आहे. इतकें सहज, सरळ हरीचें नाम असतांना तें न घेतां मानव

जिवाचा कल, जें सहज साधण्यासारखें नाहीं अशा साधनांकडे कां असावा ? जीव हा सुखाचा शोध करीत आहे, आणि त्याकरतां तो एक क्षणाचासुद्धां विसांवा न घेतां सारखी धडपड करीत आहे याचें कारण जिवाचा जन्म वा उत्पत्ति सुखांतूनच झाली आहे. ज्या स्थानांतून या जिवाचा उगम झाला आहे तें-स्थान सतत आनंदामृतानें भरून वहात आहे. त्या सुखाचा झरा कधींहि आटला नाहीं, आटत नाहीं व आटणारही नाहीं. तो सत्य नित्य आहे. आणि त्या झऱ्यांतून आपल्या मुखानें जिवाला विश्रांति मिळावी, निजशांति लाभावी व समाधान प्राप्त व्हावें म्हणून जिवाची सारखी खटपट चालू आहे. आणि त्याच्याकरतांच संतांनीं "आवडीनें भावें हरिनाम घे" असें सांगितलें.

**बाप रुक्मादेवीवरु विठ्ठल आवडी ।**
**गोडियेसि गोडी मिळोनी गेली ॥**

ज्या सुखाची याला गोडी आहे, त्या गोडीची गोडी याच्याजवळ सतत असूनही हा तिच्या शोधांत आहे. जिलबीची गोडी याला आहे. याला वाटतें जिलबींत गोडी आहे. असें जर आहे तर ती सदाच गोड लागती पण कंटाळा येईपर्यंत खाल्ल्यास ती पुरे असें म्हणतों त्याचप्रमाणें ज्वर आला असतां तोंड कडू होतें आणि मग गोड असलेली ती जिलबी दृष्टीसमोर नकोशी होते; म्हणजे जिलबींत गोडी नसून हा आपल्या अंतर्यामी असलेल्या गोडीचा भोग जिलबींतून घेत असतो. गोडीचा सांठा जिवांजवळ आहे. अर्थात् ज्या गोडीपासून ह्या जिलबीच्या गोडीची उत्पत्ती आहे, ती निजगोडी, त्या गोडीची कल्पना जिवाला न लाभल्यानें अगर न उमजल्यामुळें हा त्या जिवाचा सावळागोंधळ झाला आहे. जिवाची निजगोडी जिलबीच्या गोडीद्वारें प्रतीत होऊन अनुभव घेत असते. अशी जी निजगोडी, त्या गोडीवर आवडीनें प्रेम असणें हाच जिवाचा "हरिनाम" घेऊन संतांनीं खरा धर्म सांगितला आहे.

श्रीसाईलीला मासिक हें संस्थान कमिटीनें श्रीसद्गुरु साईनाथनामाच्या गोडीची गोडी सर्व आबालवृद्धांमध्यें व्हावी म्हणून तें अव्याहत चालविण्याकरतां संपादकाचा आटोकाट प्रयत्न आहे.

श्रीसद्गुरु साईनाथ महाराज समाधिस्त झाल्यानंतर कांहीं त्यावेळच्या निस्सिम भक्तांनीं हें साईलीला मासिक सुरू केलें. साईबाबांविषयींचे अनुभव, दृष्टांत व हरतऱ्हेचे बाबांपासून झालेले सांसारिक, प्रापंचिक, पारमार्थिक फायदे साईलीलेंतून प्रसिद्ध झाल्यामुळें साईबाबांचें प्रचारकार्य आज ३२ वर्षांनीं साईबाबांच्या शिरडी गांवचें रुपांतर कसें झालें आहे तें आपण आज उघड्या डोळ्यांनीं पाहात आहोंत.

कांहीं कारणामुळें श्रीसाईलीला मासिक बंद झालें होतें तें आतां त्रैमासिक म्हणून सुरू होऊन दोन वर्षे पुरीं होऊन तिसऱ्या वर्षाचें बालक रांगत आहें. त्या रांगत्या बालकाला स्वतःच्या अनुभवाचें दूध पाजणें व त्याला वाढविणें हें प्रत्येक साईभक्तांचें काम नव्हे कर्तव्य आणि खरोखरीनेंच जर तें वाढलें ( मोठें झालें ) तर ऐन तारुण्यांत सबंध हिंदुस्थानला हें आपल्या कबजांत घेतल्याशिवाय राहणार नाहीं ही खात्री आहे.

त्या बालकाला सर्व भक्तांनीं सालीना सहज सव्वादोन रुपयांचा खुराक देऊन व देववून वाढवितां येण्यासारखें आहे असें असतांना त्या बालकाला विचारीत तर नाहींच परंतु मोठमोठ्या योजना, घटना अशक्य कोटींत असणाऱ्या व दिसणाऱ्या वार्ता करण्याची पोकळ हांव धरीत आहेत.

नाना वासनांचा, नाना कल्पनांचा, नाना विचारांचा, नाना जन्मांतरींच्या, अनुभवाचा सांचविलेला गठ्ठा म्हणजे मनुष्यप्राणी होय. भानगडींची ज्या जिवास आवड, उपाधींचा ज्या जिवास सोस, दुस्तर मार्गांची ज्या जिवास प्रीति त्या जिवास सुलभ अशा भावाची हांक कशी ऐकूं येणार? सात दिवस निराहार राहिल्यास सुंदर योग साधला जाईल असें कानीं पडल्यास त्या मार्गांवें जीव अवलंबन करील पण तेंच पोटभर जेवून श्रीसाईचें नामस्मरण करण्यास त्याला कसेंसेंच वाटेल; कारण जिवास "शीतळ हा पंथ, माहेराची वाट" पटत नाहीं. जिवाची कष्टसाध्य करण्याची प्रवृत्ति या कलियुगांत आहे. संत तुकोबारायांनीं हा अनुभव घेऊन सिद्ध केलें आहे. त्यांनीं एके दिवशीं दहा–पंधरा मजुरांना, जे सकाळपासून संध्याकाळपर्यंत दहा–बारा आणे रोजीवर होते अशांना बोलाविलें व त्यांना त्यांची रोजगारी देऊं करून आपल्या घरीं कामास येण्यास सांगितलें. दुसरें दिवशीं ते मजूर संततुकारामाच्या घरीं आल्यानंतर त्यांनीं प्रत्येकाच्या हातांत टाळ दिला व स्वतः बसून देवाचें नामस्मरण (हरिभजन) करण्यास प्रारंभ केला. दिवसाच्या शेवटीं तुकारामांना असा अनुभव आला कीं, प्रत्येक टाळकरी पेंगत होता पण केवळ मजुरीसाठीं त्यांना बसणें भाग पडलें. शेवटीं मजुरी घेतल्यावर मजूर म्हणाले, "महाराज! उद्यां कांहीं आम्हीं तुमच्याकडे कामास येणार नाहीं. क्षमा असावी" कारण त्या लोकांना नामस्मरणाची खरी गोडी नव्हती–भावाशिवाय नामस्मरण फोल आहे.

श्रीसाईबाबांविषयीं जर जिवाला खरी आवड असेल तर तो आज सुरू असलेल्या श्रीसाईलीला त्रैमासिकालाच धरून राहील व आपलें प्रेम प्रगट करील.

साईभक्तांनों, भलत्यासलत्या फंदांत न पडतां साईलीलेवर निस्सिम प्रेम करा, आपलें प्रेम द्या म्हणजे साईलीलेच्या गोडीनें आपणांस श्रीसद्गुरु साईनाथांची अव्याहत असणारी गोडी चाखण्यास मिळेल.

संपादक.

---

# श्री साईबाबांची बोधवचनें

(मागील अंकावरून पुढें चालू)

(६)

परीसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें. तें मग पाहिजे तर जमिनीखालीं पुरून ठेवा, अथवा उकीरड्यावर फेंका तें सोनेंच राहील, पुन्हा तें लोखंड व्हायचें नाहीं!

त्याचप्रमाणें सर्वशक्तिमान प्रभूच्या चरणरजानें ज्याचें अंतःकरण एकदां कां पवित्र झालें कीं, त्याची स्थिति अशीच होते. तो मग पाहिजे तर संसाराच्या गडबडींत राहो किंवा अरण्यांतल्या एकांतवासांत राहो. तो केव्हांहि अपवित्र व्हायचा नाहीं.

(७)

लोखंडाच्या तरवारीस परिसाचा स्पर्श झाला, कीं ती सोन्याची होते; पूर्वीप्रमाणें तिचा जरी आकार असतो तरीं ती नंतर लोखंडाच्या तरवारीप्रमाणें इजा करण्यास असमर्थ होते. त्याप्रमाणें ईश्वरचरणाच्या रजःस्पर्शाचा लाभ ज्याला झाला आहे त्याच्या बाह्य आकारांत कांहीं बदल झाला नाहीं तरी त्याच्या हातून कोणाचें वाईट होत नाहीं.

(८)

समुद्राच्या तळाशीं असलला लोहचुंबकाचा खडक वरून चाललेल्या जहाजाला आपल्याकडे ओढतो; त्याचे सर्व लोखंडी खिळे उपटून काढतो व सर्व फळ्या निरनिराळ्या करून सोडतो, आणि शेवटीं तें जहाज समुद्रांत बुडवितो. त्याप्रमाणें जिवात्म्याला परमात्मज्ञानाची–विश्वात्मैक्याची ओढ लागली म्हणजे तें मनुष्याचें व्यक्तित्व व स्वार्थ यांना एका क्षणांत नाहींसें करून सोडतें व त्याला परमेश्वराच्या अगाध प्रेमसागरांत बुडवून टाकतें.

(९)

दूध पाण्यांत घातलें असतां तें लागलेंच त्याशीं मिसळतें; पण तेंच दुधाचें लोणी करून पाण्यांत टाकलें असतां तें त्याच्याशीं न मिसळतां वर तरंगतें. तसें एखाद्या जिवात्म्याला ब्राह्मी स्थिति लाभली, म्हणजे तो जरी अनेक बद्ध जिवांच्या संगतींत नेहमीं राहिला, तरी त्याला त्यांच्या वाईट संस्काराचा संसर्ग बाधत नाहीं.

(१०)

नवोढा तरुणी मूल झालें नाहीं तोंपर्यंत गृहकृत्यांत निमग्न असते; पण मूल होतांक्षणींच ती गृहकृत्याकडे दुर्लक्ष करूं लागते. तिला त्यांत मग गोडी वाटूं लागेनाशी होते. सर्व दिवसभर ती आपल्या लाडक्या मुलाला गोंजरून लडिवाळपणें त्याचे मुके घेत असते; त्याप्रमाणें मनुष्य अज्ञानदशेंत असेपर्यंत अनेक कार्यांत मग्न असतो; परंतु एकादां का त्याच्या अंतःकरणांत परमेश्वराची ओळख पटली म्हणजे त्याला त्या कार्यांत गोडी वाटेनाशी होते. उलट ईश्वराची सेवा करण्यांत आणि ईश्वराच्या इच्छेनुरूप वागण्यांत त्याला सुख वाटूं लागतें. दुसऱ्या कोणत्याही व्यवसायापासून त्याला आनंद होत नाहीं. आणि ईश्वर दर्शन सुखापासून च्युत होणें त्याला आवडत नाहीं.

अनुवादक व संग्राहक

(अपूर्ण)

**श्रीराम बाळसराफ**

मुंबई २७.

संपादक ' **श्री साईलीला** '

श्री. डॉ. के. भ. गव्हाणकर यांसः—
सप्रेम चरणीं नमस्कार

कळावें कीं, तुमची आमच्यावर असलेली कृपादृष्टि ही केवळ ' बाबांच्या ' आशिर्वादाचेंच फळ होय. तें फळ आम्हीं चाखल्यापासून आमच्यांत असलेली अहमहमिका, अभिमान, स्वार्थ, लोभ यांचा समूळ नायनाट झाला. आपली कृपादृष्टी अशीच आम्हा गरीबांवर ठेवून बाबांचे आशिर्वाद आम्हांस मिळावे अशी नम्र विनंती आपल्या चरणीं करीत आहें. मी हीं ' बाबांचीं वचनें ' पाठवीत जाईन तीं नेहमीं प्रसिद्ध करावींत, अशी विनंति आहे. तशीच माझ्या प्रिय वाचकांसही माझी एक विनंति आहे कीं, हीं ' बाबांचीं वचनें ' प्रत्येक अंकांत येतील त्याचा आपण प्रेमभावानें भक्तीनें अभ्यास करून तीं अंतःकरणांत ठसावीं अशा रीतीनें पठण व मनन करावींत. व त्याचा अमृतानुभव, समर्थांच्या ' उक्तिप्रमाणें ॥ **जें जें आपणासी ठावें ॥ तें तें दुसऱ्यास शिकवावें ॥ शहाणें करूनी सोडावें सकलजना** ॥ दुसऱ्यास पाजावा. आपण असें करणें कीं दुसऱ्याला त्याचा उपभोग घेतां येईल. मोठमोठ्या संतांनीं अशी काय मोठी भक्ति केली त्याचा उपभोग आज आपण सारेजण घेत आहोंत. तसेंच आपणही अशीं कृत्यें करा कीं, या जन्मीं आपलें सार्थक कारणीं लागून त्याचा उपभोग सर्वांना मिळेल. आजच्या या बरबरटलेल्या जगाला ' एक नामा ' वांचून दुसरें तारूं शकणारें साधन नाहीं. या चालू जगांत माझ्या मतें अधर्म माजला आहे, म्हणूनच आज आपली ' मातृभूमि ' या हीनदशेला पोंचली आहे. तिची ती दुर्दशा पाहून खरोखर नको हें जीवन असें वाटूं लागतें. तिच्या या मुलांना आज या देशांत कोठेंच थारा नाहीं. " आई जेऊं घालिना, बाप भिक मागूं देईना, " अशी खरोखरच देशाची स्थिति होऊन राहिली आहे. कोण सुखांत, कोण दुखांत, कोण माड्यामहालांत, तर कोण फुटपाथवर, कोणी सिनेमा–नाटकाच्या गडबडींत तर कोण आज खाल्लें, उद्यां कसें होईल ? या विवंचनेंत, कोणी विश्वासानें बोलतात व गळा कापतात. भाऊ बहिणीला विचारीना, बहीण भावाला मानीना, पुत्र आई–बापाला विचारीना, शिष्य गुरूला मानीना. अशा या अधर्मी जगतांत जिकडे तिकडे कहर माजला. राष्ट्र राष्ट्राला खाऊं कीं गिळूं या दृष्टीनें पहात आहेत. एकमेकांचे लचके तोडूं पहात आहेत. अरेरे ! या हीन जगतांत कोण तारूं शकणार ? मला वाटतें कीं या जगीं ' एक ईशनामावांचून ' दुसरें कोणी तारूं शकणार नाहीं. तुकारामाच्या उक्तिप्रमाणें

**नाम घेतां उठाउठी ।**

खरोखर संतांचे किती हे उपकार आहेत आपल्यावर ! त्यांचें तें राष्ट्राला वाहिलेलें जीवनपुष्प, तें फुकट कधीं जाणार नाहीं. तें दुसऱ्याला सुवास देतच सुकणार. उदबत्ती स्वत: जळेल, राख होईल, परंतु ती दुसऱ्यास सुगंधमय करून सोडील. तेव्हां भक्तजनहो ! ऐका, आपला देश, आपलें जीवित पुढें सुखमय करावयाचें असेल तर आपण

' श्री साईबाबांच्या ' चरणाची आण घेऊन असें वदूं कीं, आजपासून मी निष्ठेनें वागेन, सत्य व अहिंसा यांचा अंगिकार करीन अन् दुसऱ्यांच्या हितासाठीं माझें जिवन सार्थकीं लावीन. आणि ईशनाम गात राहीन निश्चयानें—

॥ तुटो हें मस्तक । तुटो हें शरीर ॥
॥ परी नामाचा गजर । सोडूं नये ॥

-तुकाराम

श्रीराम बाळसराफ,
मुंबई.

---

# साई-प्रभाव

**श्रीसाईराम प्रसन्न**

(१)

बेळगांव
१८-७-५०

श्री. सन्मान्य चिटणीस

श्री साईबाबा संस्थान कमेटी शिरडी.

मुक्काम मुंबई यांसी,

"बाबां"च्या येशाचा सप्रेम नमस्कार, वि. वि.

मी "बाबांच्या" पायीं चार भुपाळ्या करून या गुरुपौर्णिमेनिमित्त अर्पण केल्या आहेत. त्या येथें खालीं देत आहें. पसंत पडल्यास त्या येत्या अंकांत (श्री साईलीलेंत) छापाव्यात व छापल्यास तो अंक व त्याच्या किंमतीसहीत (पोष्टेजसह) मजकडे पाठवावा. माझा पत्ता खालीं देत आहें.

"बाबां"चा यशवंत

---

# भूपाळ्या

१

उठा उठा बाबा-साई, प्रात समय झाला ऽ ।
साक्षात् ईश्वर भूलोकीं या, तुम्ही अवतरला ।
सहज-स्फूर्तीं, म्हाळसापतिला सुचवि नांवाला ।
म्हणूनी "साई" जन हे म्हणती, बाबा, आपणाला ।

दिशा दाहि त्या उत्सुक होउनि, दर्शनासी आल्या ।
दर्शन घेउनि करूं म्हणाति त्या आपल्या पूजेला ॥
नव-रत्नांचा हार तयांनीं सुंदर बनवीला ।
रत्नें कसलीं ? नक्षत्रें तीं नभांगणांतील ।
वेंचुनि त्यांचे केले नव-सर कंठि शोभतील ।
नऊ सरांचा हार करोनि, पानडी सूर्याची ।
चंद्राचा तो आकडा त्याला, भक्त-मन खेची ।
ऐशा सुंदर हारा गुंफुनि, उभ्या पूर्व द्वारीं ।
हाराचें त्या तेज पसरलें पूर्वेला भारी ॥

(२)

उठा उठा बाबा-साई प्रातः समय झाला ऽ ।
साक्षात् ईश्वर भू-लोकीं या, तुम्ही अवतरला ।
दंव सुमनांचें अर्घ्य पाद्य तें, धरा आणती झाली ।
कफनी घेऊनी जरतारीची उषा तीहि आली ।
कस्तुरि-सौरभ घेउनि हातीं वायुहि तो आला ।
भाली आपुल्या सुंदर खासा टिळा लावण्याला ।
सूर्य-करांचा घेउनि टेंभा, अरुण उभा हा वीळ[1] ।
भृंग धरी तो सूर, सनया पक्षिहि घेतील ।
वायू-लहरी थाप मृदंगी त्याही देतील ।
वृक्षलताही सज्ज करोनि पर्णांचे टाळ ।
पूजन होतां सुरू तुमचे भक्त गर्जतिल ।

[१] वेळ

(३)

उठा उठा बाबा-साई, प्रातः-समय झाला ऽ ।
साक्षात् ईश्वर भू-लोकीं या आपण अवतरला ।
समाधि उतरुनि सत्वर उघडा आपुल्या नयनाला ।
कृपादृष्टिनें अवलोकुनिया धन्य करा सकलां ।
मधुर वचामृत तुमचें तें हो, कानिं ओतण्याला ।
अवघा जन हा आतुरतेनें उत्सुक बहु झाला ।
दर्शन देउनि द्या तुम्ही हो, त्या नव-नीताला ।

येशा होई उत्सुक तोहि दर्शन घेण्याला ।
देउनि तें हो, तुम्ही त्याला, द्या किं प्रसादाला ।

(४)

अहा ! ! उतरली समाधि फुलली नेत्र कमलें ।
चराचरांनों, तसें दिशांनों, दर्शन घ्या हें भलें ।
अर्पा तुमचें अर्घ्य पाद्य तें सुमनें हाराला ।
टिळा लावुनि चित्-शक्तींच्या तेजस्वी भाला ।
धरुनि कांकडा हातीं तुम्हीं, ओंवाळा साई ।
बोधामृत तें प्रसाद म्हणुनी हा तुम्हा देई ।
पायीं ठेउनि डोई तुमची, प्रसाद हा मागा ।
प्रेम-भक्तिचा डेरा घुसळुनि देईल हा, खा गा ।
बाबा तुमचा येशा जोडुनि हात, उभा ठाके ।
सर्वांमागें असे म्हणुनि त्या विसरुं नका भाके ।

"बाबां" चा येशा
**यशवंत उर्फ विष्णु वासुदेव केळकर.**
१६११ महादेव गल्ली,
बेळगांव.

(२)

**श्री**

१७ बी, सरस्वती बाग,
जोगेश्वरी, मुंबई.

संपादक महाशय.

"श्रीसाईलीला" यांस कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार वि. वि.

मी या पत्रासोबत एक कविता पाठवीत आहें ती आपणांस पसंत पडल्यास आपण ती कविता येत्या अंकांत प्रसिद्ध करावी, कृपालोभ असावा.

आपला गुरुबंधु,
**भवानीशंकर नी. वागळे.**

# ॥ श्री साईनाथ सद्‌गुरु ॥

जय श्री साईनाथ सद्‌गुरु ॥
तूं माय, मी लेकरूं
तूं जग-चालक
तूं प्रतिपालक
तूं प्राण, मी पाखरूं
जय श्री साईनाथ सद्‌गुरु ॥ १ ॥
तूं नर-नायक
तूं भवतारक
तूं नाथ, मी किंकरुं
जय श्री साईनाथ सद्‌गुरु ॥ २ ॥
तूं भयहारक
तूं सुखकारक
तूं गाय, मी वासरु
जय श्री साईनाथ सद्‌गुरु ॥ ३ ॥
तूं शुभ मंगल,
तूं नित सुविमल,
तूं ज्ञानाचा सागरु
जय श्री साईनाथ सद्‌गुरु ॥ ४ ॥

रचणारः-
**भवानीशंकर नी. वागळे.**

( ३ )

चर्च बंगला
धुळें ता. २६।८।५०

श्री संपादक **श्री साईलीला** यांस,

स. न. वि. वि. खालील मजकुरास आपल्या लोकप्रिय मासिकांत स्थान द्याल अशी आशा आहे.

आमच्या श्रीसाईबाबांच्या लीला अगाध आहेत. अनेकांचे अनेक अनुभव, किती म्हणून ते वर्णन करून सांगायचे. परंतु अकल्पितपणें तसा अनुभव येतो, तेव्हां किती आनंद होतो. आपल्याला आलेली ती प्रचीति दुसऱ्या कोणासतरी सांगाविशी वाटते व

त्यांत एकप्रकारचें सामाधान वाटतें. असे हे आलेले अनुभव पाहून ज्यांची श्रद्धा असते त्यांची श्रद्धा वाढते व ज्यांची नसते त्यांची बसते.

अगदीं ताजी गोष्ट म्हणजे मागल्या महिन्यांत (माहे जुलैमध्यें) गुरुपौर्णिमा होती, त्या वेळेस माझ्या यजमानांनीं गुरुपौर्णिमेनिमित्त श्रीसाईलीला पोथीचा सप्ताह सुरू केला व ती पोथी गुरुपौर्णिमे दिवशीं पुरी केली. आम्हीं दोघांनीं यथायोग्य व ऐपती-प्रमाणें श्रीसाईबाबांचा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला. गुरुपौर्णिमेच्या दिवशीं संध्याकाळीं आरती, भजन वगैरे झाल्यावर मी रात्रीं साडे आठाचे सुमारास जेवणाचीं पानें वगैरे घेण्याच्या तयारींत होतें. स्वयंपाक घराच्या दाराजवळ जातांच एका मोठ्या विंचवानें माझ्या डाव्या पायाच्या आंगठ्याजवळच्या बोटास एकाएकीं नांगी मारली व मला दंश केला.

काय चावलें म्हणून मी पाय झटकतें तोंच त्यानें त्याच बोटास पुन्हां नांगी मारली. विंचवाच्या दंशामुळें थोड्या वेळांत म्हणजे ३।४ मिनिटांत वेदना पायाच्या पोटरीपर्यंत येऊं लागल्या व त्या असह्य होऊन मी मोठ्यानें ओरडूं लागलें. मी लगेच आमचे येथें पूर्वी कामास असलेल्या रतन नांवाच्या माणसास एकदम हांक मारली. (आमचा रतन जरी तो वयानें १८।२० वर्षांचा असला तरी तो आम्हां दोघांप्रमाणेंच श्री साईबाबांची नेहमीं भक्ती करीत असतो.) मी जेव्हां रतनला हांक मारली तेव्हां रतन व माझे यजमान दोघेही धांवत माझ्याकडे आले. तो काळा विंचू हळूहळू जात होता. त्याला प्रथम काठीनें मारण्यांत आलें. माझे यजमानांनीं विंचवाच्या वेदना वर जाऊं नयेत म्हणून पोटरीला घट्ट फडक्यांनीं बांधलें तरी देखील वेदना असह्य होऊन वर जाऊं पहात होत्या. माझे यजमानांनीं ताबडतोब आमच्या दुसऱ्या माणसास आमचे फॅमिली डॉक्टर, जे आमच्या जवळच रहातात, त्यांच्याकडे विंचवाचें औषध आणण्याकरितां पाठविलें. मनुष्य डॉक्टरकडे पाठविल्यावर माझ्या यजमानांना बाबांच्या उदीची आठवण झाली व त्यांनीं उदी आणून जेथें विंचू चावला होता तेथें ती लावली व त्याचप्रमाणें मला थोडीशी उदी पाण्यांत घालून पिण्यास दिली. उदी लावितोंपर्यंत माझ्या, विंचवाच्या वेदना मला फार त्रास देत होत्या पण उदी दिल्यावर सुमारें पांच मिनिटांत विंचवाच्या वेदना एकदम कमी होऊं लागल्या व आपणांस कळविण्यांत आनंद वाटतो कीं, सुमारें दहा मिनिटांत विंचवाच्या वेदना अजिबात कमी झाल्या व मला उभें राहतां येऊं लागलें व थोड्याच वेळांत मी स्वतः जेवणाचीं पानें वाढलीं. अमचा रतन जो डॉक्टरांचें औषध आणण्यास गेला होता तोही ताबडतोब म्हणजे माझे यजमान उदी लावीत होते तेव्हांच डॉक्टरांचें औषध घेऊन आला. परंतु डॉक्टरांच्या औषधाचा उपचार करण्याची वेळ राहिली नव्हती. मला जेव्हां विंचवानें दंश केला तेव्हां मी सारखी मनांत बाबांची आठवण करीत होतें. त्याचप्रमाणें उदी लावल्यावर मला अनुभव आला. हा अनुभव आपणांस सविस्तर कळवीत आहें. मला याच्या आधीं दोनदां विंचू चावले होते व त्या

विंचूदंशामुळें मला रात्रभर वेदना झाल्या होत्या. आम्हीं दोघेजण आज बरींच वर्षें श्री साईबाबांची यथायोग्य व आमच्या ऐपतीप्रमाणें भक्ती करीत असून आम्हीं त्यांचे भक्त आहोंत. वरील लेखांत माझ्या कांहीं चुका असल्यास त्या आपण दुरुस्त कराव्या व पुढील त्रैमासिकांत माझा वरील बाबांच्या विषयींचा अनुभव प्रसिद्ध कराल अशी आशा आहे. आपणांस तसदी देत आहें त्याची माफी असावी. कळावें.

श्री साईभक्त,

**सौ. विमलाबाई केशवराव खारकर,**

धुळें

(४)

**ॐ श्रीसद्‌गुरुसाईदत्तायनमः**

मुंबई

ता. २७–८–५०

श्री. संपादक, ' **श्रीसाईलीला** ' यांस.

सप्रेम सा. नमस्कार. आपण सवडीप्रमाणें, खालीं लिहिलेला साईकृपेचा स्वानुभव बाबांच्या भक्तगणांना श्रवणलाभ होण्यासाठीं साईलीलेंत छापण्यास द्यावा ही नम्र विनंति.

सन १९४१ सालीं रामनवमीच्या दिवशीं सकाळीं आम्हीं ८–९ मित्रमंडळी ( मँचेस्टर मिलमधील ) साईबाबांच्या दर्शनासाठीं श्रीक्षेत्र शिरडीस गेलों होतों. त्यावेळीं तेथें कॉलरा असल्यामुळें व्यवस्थापक मंडळी गाडींतून उतरूं देईनांत व परत जाण्यास विनवूं लागली. आम्हीं गेलेल्या मंडळींनीं बाबांचें दर्शन व प्रसाद घेतल्याशिवाय परत न जाण्याचा निश्चय केला होता. श्रीसाईबाबांनीं पुढें आमची सर्व व्यवस्था करविली व आम्हीं तेथील रामनवमी उत्सवाचा आनंद लुटून त्याच दिवशीं संध्याकाळीं परत आलों.

मी लहानपणापासून श्री. दत्तात्रयाची पूजाभक्ती करतों. सन १९४१ पासून आजपावेतों मी मधून मधून डॉ. गव्हाणकर यांच्या घरीं श्रीसाईबाबांच्या निरनिराळ्या उत्सवाच्या वेळीं जात असतों. मात्र गुरवार ता. २३ डिसेंबर १९४८ पर्यंत श्रीसाईबाबांचा फोटो घरीं आणला नव्हता. कारण असें कीं, माझ्या मनाचा झगडा चालला होता कीं, साईबाबा मला दत्ताच्या मूर्तितंच एकत्र दिसावेत. श्रीसद्‌गुरुसाईमाऊलीनें कृपा केली व तसा फोटो मला माझ्या मुलाच्या स्वयंस्फूर्तीनेंच ( अकल्पित ) गुरवार तारीख २३ डिसबर १९४८ रोजीं मिळवून दिला.

अनाथांना मदत करण्यासाठीं व अधर्माचा नाश करण्याठीं ईश्वर वेळोवेळीं अवतार घेत असतो. आजपर्यंत साधूसंताच्या रुपानें जे निरनिराळे अवतार श्री नरसिंह सरस्वती, श्री दत्तात्रय, श्रीसंत तुकाराम, श्री रामदास वगैरे असंख्य ईश्वरी अवतार होऊन गेले तद्वतच श्रीसाईबाबा हे अलिकडील काळांतील अवतार होत. श्रीसाईबाबा शके १८४० सालीं म्हणजे ३२ वर्षांपूर्वी समाधीस्त झाले असले तरी ते अजून-

पर्यंत आपल्या भक्तांसाठीं जागृतावस्थेंत भेटही देतात व संकटसमयीं मदतही करतात, व पुढेंही ते असेच चमत्कार करतील यांत शंका नाहीं.

आपण मानवलोक सुखसंपन्नकालांत या ईश्वरी लीलेला पार विसरून जातों. गोष्ट अशी घडली कीं जरी श्रीसाईबाबांनीं १९४८ डिसेंबरमध्यें इच्छेप्रमाणें श्रीदत्तासहीत फोटो मिळवून दिला तरी माझी श्रीसाईबाबांवरती दृढभक्ति स्थिर झाली नव्हती. सन १९४९ डिसेंबर मध्यें माझा मुलगा फार आजारी पडला. डॉ. म्हणाले, तुमच्या मुलाचें वजन फार कमी होत आहे. हा आजार चिंताजनक आहे. मी एकदम संकटांत पडलों व लगेच ईश्वर आठवला. दुसऱ्याच दिवशीं श्रीक्षेत्र शिरडीनिवासीं जाऊन मशिदींत बाबांच्या फोटोसमोर लीनतेनें बसून बाबांना नम्र प्रार्थना केली व आपल्या अवताराबद्दल आज ८।९ वर्षें शंका-कुशंका घेत राहिल्याबद्दल माफी मागितली. मुलाला आरोग्य मिळावें व आपला सदैव शुभाशिर्वाद लाभावा अशी करुणा भाकून मुलाला आरोग्य लाभतांच आपल्या पायांजवळ सर्व कुटुंबासहीत १-२ महिन्यांतच हजर होईन अशी इच्छा केली. नंतर १५ दिवसांचें आंत औषध देणारे डॅाक्टर म्हणाले, ‘तुमच्या मुलाची प्रकृति सुधारली असून आतां औषध बंद करा.’ श्रीसाईबाबांच्या कृपेनें मुलाची प्रकृति आतां उत्तम आहे.

श्रीसाईबाबांस वचन दिल्याप्रमाणें आम्हीं फेब्रुवारी तारीख १४ मंगळवार रोजीं रात्रीं महाशिवरात्रींच्या आदल्या दिवशीं श्री साईबाबांच्या भेटीस निघालों. आम्हांला ९ ची गाडी चुकली. मुलें म्हणूं लागलीं, “बाबा आतां कसें होणार ! १० च्या गाडींत गर्दी असते व आम्हांला इतक्या ६ माणसांना जागा कशी मिळणार !” मी उत्तर दिलें-“ बाबाच सर्व व्यवस्था करतील. तुम्हीं काळजी न करतां आपल्या बाबांच्या बाबांवर विश्वास ठेवा. आणि आश्चर्य असें झालें कीं, खरोखरच श्रीसाईबाबा स्टेशनांत उभे राहून आम्हांला रिझर्व जागेसारखी एक १६ सीटची जागा उघडून दिली व “ आरामानें प्रवास करा ” असें सांगून निघून गेले. आम्हीं अर्धा भाग घेतला. मनमाडपर्यंत आमच्या जागेंत कोणीही दुसरे उतारू आले नाहींत, त्यामुळें आमचा प्रवास फार सुखाचा झाला. श्रीसाईबाबांवर अढळ श्रद्धा ठेवल्यास ते सदैव आपल्या सान्निध्यांत असल्याचा पावलोंपावलीं अनुभव मिळतो. श्रीसाईबाबांवर आम्हां सर्व मानवांची दृढ श्रद्धा बसो व त्यांच्या शुभाशिर्वादानें आम्हां सर्व भक्तगणांचें कल्याण होवो, अशी सदिच्छा करून या लिखाणाच्या प्रसिद्धीच्या तसदीबद्दल क्षमा करावी अशी इच्छा करतों.

आपला नम्र,

दत्तगुरु.

(५)

**श्री साई**

**जगीं सर्वसुखी असा कोण आहे ।**
**विचारी मना तूंच शोधूनि पाहे ॥**

जगांत सर्वसुखी तेच कीं ज्यांनीं सर्वस्व देवाला —श्री साईला अर्पण केलें आहे-त्यांच्यावर सर्व भार टाकून राहिलेले आहेत. मला श्रीसाईला प्रत्यक्ष पहाण्याचें भाग्य लाभलें नसलें तरी श्रीसाईची थोरवी साईलीलेंत वाचून शिरडी मुक्कामीं गेलों व हळूहळू माझी त्यांच्यावर फार श्रद्धा बसली; ती एवढी कीं कोणाचेंही काम करणें असल्यास, श्री-साईस-त्यांच्या निस्सिम भक्तांस व ज्यांनीं मला पुढील मार्ग दाखविला त्या माझ्या गुरुमाऊलीस विचारीत असे.

एकदां माझी भावजय बांळतपणासाठीं हॉस्पिटलमध्यें गेली होती. प्रसुती वेदना येऊं लागल्या पण ७२ तास झाले तरी बाळंत होण्याचें चिन्ह दिसेना. ताबडतोब मी माझ्या गुरुमाऊलीकडे धांवलों. त्यांनीं श्रीसाईची उदी दिली व म्हणाले, " तुझ्या भावजयचें बाळंतपण श्रीसाईनीं केलें आहे, जा, त्यांच्यावर विश्वास ठेव, तेच तारतील. " घरीं परत आलों तों खरोखरीनेंच हॉस्पिटलमध्यें तिची सुटका झाली होती व पुत्ररत्न झालें होतें. बाळबाळंतीण सुखरूप पाहिलीं. आम्हां सर्वांना तसेंच हॉस्पिटलमधील सर्व लोकांस आश्चर्य वाटलें.

असेच श्रीसाई आपली लीला सर्व भक्तगणांस दाखवोत अशी इच्छा आहे.

**गणपत शिर्के,**
विले-पारलें.

( ६ )

**श्री साई**

**पद पहिलें.**

निरस हें जग मना, गमतसे साईविना ॥
दुष्ट कटु भावना, विरती तव दर्शना ॥ धृ० ॥ निरस
तवचरणीं प्रार्थना ॥ विरस, नच, क्षण क्षणा ॥
ठायीं ठायीं, साई-साई, ॥ दिसत मम लोचना ॥
निरस, हें जग मना ॥ १ ॥

**पद दुसरें**

चालः—(मानापमान नाटक-**या नवनवल नयनोत्सवा**)

ही उदी, अमरसंजीवनी ॥ लावा हो, जनी नेमाने तुम्हीं ॥ सौख्याची ती खाणीं ॥ धृ० ॥ ही दुर्धर हट्टी रोग विखारी ॥ भूतसमंधा मारी, ॥ दुर्गुण आपुले, उदीच्या संगें ॥ सोडुनी लागती भजनी ॥ ही उदी अमर० ॥ १ ॥

**पद तिसरें** ( मुरली )

ही, मधुर मुरली वाजिव, राधा, ऐकाया आली ॥ धृ० ॥ सोडुनिया काम आले ॥ मुरलीनें या मोहविले ॥ वाट पाहुनि दमूनि गेले, येयें वनमाळी

॥ १ ॥ ही मधुर ॥ मजवरी कां, कोपलासी काय झाली चूक मजशी ॥ ना, येशील तरी तूं अतां देईल मी सखया प्राणासी ॥ २ ॥ ही मधुर ॥ ऐकुनी ही भक्तिवाणी ॥ धावे मग तो चक्रपाणी ॥ शेषशाई आणि–साई–एकची, पाहुनी नवलाई ॥ ही मधुर० ॥ ३ ॥

**पद चौथें** ( भैरवी )

[ संशय कल्लोळ, नाटक. ]

खचित दिसत मम भाग्य उदेलें ॥ धृ० ॥ बहुत दिनांची मनिषा होती ॥ दर्शन, देऊनि, भेटुनी गेले ॥ १ ॥ जन्मापासुनी दुःखी कष्टी ॥ पाहूनी मूर्ति, स्थिर मन झालें ॥ खचित ॥ २ ॥ पवित्र चरणां, विनम्र, नमिले ॥ वरदहस्तें मज उठविले ॥ खचित ॥ ३ ॥ जाई पुढती, आहे पाठी ॥ रक्षी, मी तुज, ऐसे वदले ॥ ४ ॥ खचित० ॥

**समाप्त**

**पी. आर. जोशी**
२७९ शनिवार पेठ,
ओक यांचा वाडा, पुणें.

( ७ )

**॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥**

संपादक महाशय,

श्री साई–लीला मासिक यांस सा. नमस्कार वि. वि. मी खालीं लिहिलेल्या दोन शब्दांस श्रीसाईबाबांच्या लीलेमध्यें स्थान द्याल अशी बळकट आशा करतों.

माझा मुलगा ता. ११ जुलै १९५० पासून तापानें आजारी पडला होता. म्हणून मी डॉक्टरकडून औषधोपचार चालविले. परंतु त्याचा कांहीं गुण येत नाहीं असें वाटल्यामुळें कोठेंतरी तांत्रिक, मांत्रिक, अंगारे, धुपारे, भगतही पुष्कळ केले; पण गुण कांहीं येईना. शेवटीं मुलाचा आजार जोरांत उचल खाऊं लागला आणि त्यामुळें तर त्यास तारीख २० जुलै १९५० रोजीं ७॥ वाजतां फिट आली. ती जवळ जवळ १॥ तास होती. त्यावेळीं एक डॉक्टर घरीं आणून इंजिक्शननें फिट बंद केली आणि औषधही त्या डॉक्टरचेंच चालू ठेवलें. तरी आजार कांहीं बरा होईना. शेवटीं डॉक्टरनीं मला सांगितलें कीं, "मुलास के. ई. एम्. मध्यें घेऊन जा, त्यास मेंदूचा विकार आहे." तेव्हां माझी स्थिति वेड्यासारखी झाली. शेवटीं मी मुलास हॉस्पिटलमध्यें दाखल केलें, पण तेथेंही त्याची प्रकृति बिघडावयास लागली. त्याही ठिकाणीं औषधोपचार चालू असतांही ता. २६–७–५० रोजीं पूर्ववत फिट आली. त्यामुळें त्यास गॅसवर ठेवण्यांत आलें. तेव्हां माझी मनोदेवता मजपासून पळाली, व मुलाची आशा नष्ट होऊं लागली. जेव्हां

मी ता. १-८-५० रोजीं शाळेंत हजर झालों त्यावेळीं माझे एक व्यवसाय बंधु साईभक्त यांनीं मला धीर देऊन सांगितलें, " तुम्हांला साईबाबा माहीत आहेत काय ? नाहींत. ते मोठे संत होऊन गेले. ते आतां परब्रह्म झाले. ते या कलियुगांत जिवंत आहेत. त्यांना शरण जा व एक विश्वास ठेवा व अनुभव घ्या. ते तुमच्या मुलास बरे करतील. बरा झाल्यावर बाबांचे चरणीं घाला. साई-बाबांची समाधी अहमदनगर शिर्डी येथें आहे " असें म्हणून त्यांनीं मला बाबांची उदी दिली ती घेऊन मी हॉस्पिटलमध्यें गेलों व मुलाला लावली तोंच तो सुधारूं लागला. असें असतां मी त्यांचेकडे फोटो मागूं लागलों. ते म्हणाले, " बाबांचा फोटो वाटेल तिथें मिळतो " पण दुसरे दिवशीं माझ्या टेबलाचे खणांत एकाएकीं बाबांचा फोटो मला मिळाला. नवल हें कीं, त्याच दिवशीं ता. २०-८-५० रोजीं डॉक्टरनीं माझे मुलास घरीं नेण्यास सांगितलें. हा मी मोठा योगायोग समजतों. त्या दिवशीं बाबाच माझ्या घरीं जन्मास आले, असें मला वाटलें. तें जरी कांहीं असलें तरी त्या थोर संतमहात्म्याचे नांवें वरील मानवता जगूं शकते असें माझें ठाम मत आहे. म्हणून त्यांस प्रत्येकानें भक्तिभावानें शरण जाणें हें प्रत्येकाचें आद्य कर्तव्य होय. या संतमहंताच्या ( साईबाबांच्या ) नांवेंच माझा मुलगा परत लाभला असें मला वाटते. मला बाबांचें नांव सांगितल्यापासून त्यांचा मी एक भक्त झालों आहें, एवढे प्रेमाचे बोल सांगून बाबांच्या चरणीं मस्तक ठेवतों.

साईबाबांचा एक भक्त,

**अनंत शंकर कांबळे.**

माझा पत्ताः—बी. डी. डी. चाळ, नं. १२ बी,

खो. नं. ७१।७२

मु०॥ नायगांव, दादर, मुंबई १४

**ता. क.**:—आजपासून बाबांच्या साईलीलेचा वर्गणीदार होण्याकरतां २ रु ४ आ. ० पै पाठवीत आहें; तरी मला अंक मिळावे अशी आशा आहे हे विज्ञापना होय.

आपला,

**अ. एस्. कांबळे.**

---

# वारकरी संप्रदाय

## कीर्तन-माला

**पुष्प पहिलें.** ( मनास उपदेश )

जय जय रामकृष्ण हरी । जय रामकृष्ण हरी ॥

राजाराम कृष्ण हरी । राजारामकृष्ण हरी ॥

पुंडलिक वरदे हरि विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम,
श्री पंढरीनाथ महाराज, श्री सच्चिदानंद साईनाथ महाराज.

रुप पहातां लोचनीं । सुख जालें हो साजणी ।। धृ० ।।
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ।। १ ।।
बहुत सुकृताची जोडी । म्हणून विठ्ठल आवडी ।। २ ।।
सर्व सुखाचें आगर । बाप रखुमा देविवर ।। ३ ।।
विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल........................

न करी रे मना, कांहींच कल्पना । चिंति या
चरणा विठोबाच्या ।। धृ० ।।
येथें सुखाचिया अमुपाचि राशी । पुढें कल्पनेशीं ठाव नाहीं ।। १ ।।
सुखाचे ओतिले साजिरे श्रीमुख । शोक मोह दुःख पहातां नाहीं ।। २ ।।
तुका म्हणे येथें होईल विसांवा । तुटतील हांवा पुढिलिया ।। ३ ।।

सकल संत शिरोमणि परमपुज्य श्री तुकोबाराय मनाला शिकवण देताहेत, समजूत करताहेत मनाची, कीं, हे मना, न करी कांहींच कल्पना, अरे मना, कल्पना करण्याचें सोडून दे; मुळांत कल्पना म्हणजे बरी अगर वाईट, भलती अगर सलती, शंकेची किंवा कुशंकेची, कसलीच कल्पना करण्याची भानगड तूं अजिबात सोड, आणि कर काय ? तर या विठ्ठलाचे, परमात्मा श्री पांडुरंगाचे पाय धर, त्याच्या चरणांचें ध्यान कर, त्याच्या चरणांचें चिंतन कर, आणि कल्पनाविरहितेनें एकदां कां तूं असें करायला लागलास कीं तुझें तुलाच अनुभवाला येईल, कीं भगवंताच्या या चरणांजवळच सर्व सुखाच्या राशींनीं भरलेलीं भांडारेंच्या भांडारें आहेत, हें चरण युगुल सर्व सुखांनीं तुडुंब भरलेलें असून तें दुथडीं वहात आहे; सुखरुपी मोत्यांच्या कणसांनीं पूर्ण बहराला आलेलें तें एक फार मोठें शेत आहे.

" **सर्व सुखाचें आगर** " आहे

संतजनहो, आमचे तुकोबाराय किती अधिकारवाणीनें, खात्रीचा उपदेशामृताचा डोस आपणाला देताहेत कीं, बाबारे आधीं मनाला शिकवण दे.

आधीं मन घेई हातीं । तोची गणराजा गणपती ।।
मन इंद्रियाचा राजा । त्यासी सर्व भावें पुजा ।। १ ।।
मन जीवाचा प्रधान । तोची माझा नारायण ।। २ ।।
तुका म्हणे मन चंचल । घेई गुरुचे हातीं बळ ।। ३ ।।

मन चंचल असून त्याला ताळ्यावर आणण्याकरतां श्रीतुकोबाराय सद्‌गुरूकडे बोट दाखविताहेत. " आधीं मन घेई हातीं, तोची गणराजा गणपति " श्रीतुकोबारायांनीं मनाला दिलेली गणपतीची उपमा किती सार्थ आहे पहा, कोणत्याही कार्याचा आरंभ

गणपती पूजनानेंच होतो. लग्नकार्य अगर सत्यनारायणाची पूजा असो. परंतु या कलियुगांत शंका-कुशंका फार, विश्वास हा शब्दच त्यांच्या कोशांत नाहीं. एकावेळीं कांहीं लोकांनीं अशी शंका काढली कीं, गणपतिजनक श्रीशंकर त्याच्या लग्नाच्या वेळीं कोणता गणेश पुजला. या एका मुद्यावर भारे मोठमोठ्यानें वादविवाद झाला, अर्थात् कालापव्यय करण्यापलिकडे निष्पन्न कांहींच झालें नाहीं. यासाठीं ही श्रीतुकोबारायांनीं सहज सांगितलें: "**तुका म्हणे वादे, फुकट गेलीं ब्रह्मवृंदे**" आणि खरेंच संतजनहो, आश्चर्य वाटेल तुम्हांला. पण ही वादविवाद करणारी मंडळी नाशिकच्या ब्रह्मवृंदांपैकींच होती. असो. तसेंच.

**"सकल गणांचा गणपती"**

तो गणांचा नायक-पति म्हणून गणपती आणि आपल्या देहबुद्धीचे सारे व्यापार-व्यवहार देहेंद्रियांनीं मनाच्या अनुज्ञेप्रमाणेंच होतात. म्हणजे मन हा त्यांचा राजा गणराज होय. आणि म्हणूनच त्या मनालाच स्थिर करा, आणि असें एकदां कां मन स्थिरावलें म्हणजे तुमच्यांत आणि नारायणांत कांहींच फरक नाहीं अशी तुकोबा-रायासारखे संत ग्वाही देतात.

आपल्या देहाचा गाडा दहा चाकांनीं चालविला जातो. हीं चाकें म्हणजेच दशें-द्रियें. या गाड्याच्या सारथ्याचें काम, हांकाऱ्याचें काम, म्हणजे त्याच्या इच्छा लहरी-प्रमाणें हा गाडा हांकणें, आणि तो तसा हांकतांना, केव्हां कांसरा ढिला सोडणार, केव्हां सहज हातांत धरलेला असणार आणि केव्हां ताठ ओढून धरलेला असणार. या ज्या क्रिया घडतात, त्या, त्या मनरुपी सारथ्याच्या, हांकाऱ्याच्या अगर गाडीवानाच्या होत; म्हणजे काय ? श्रीतुकोबाराय हे सांगताहेत कीं, "आधीं मनाला आवर घाला, मनाला कल्पनेच्या आहारीं जाऊं देऊं नका आणि जरा का त्याला थोडासा अवसर दिलात, कीं "मन हें ओढाळ गुरु" वारा प्यालेल्या वांसराप्रमाणें चौफेर उधळणार, आणि त्यालाच पकडण्यासाठीं टपून बसलेल्या कामक्रोधादि षड्रिपूंच्या जाळ्यांत सांपडणार. आधुनिक कालांतील श्री सद्गुरु साईनाथ महाराजांनीं कै. माधवराव देशपांडे-शामा यांना विष्णुसहस्त्र नामाची चोपडी दिली व म्हणाले, "शामा, ही पोथी थोडी थोडी वाचत रहा म्हणजे मन स्थिर होईल."

बाबांनों, आपणांला पदोपदीं, हरघडीं या मनाच्या चंचलपणाचा अनुभव येत असतोच, फक्त आपलें तेवढें लक्ष असत नाहीं इतकेंच. आपण आपल्या नित्यकर्मा-प्रमाणें, सरावाप्रमाणें सकाळीं स्नान आटोपून देवपूजेला बसतों. सकाळचें स्नान हें आपल्या आर्य-सनातन धर्मांतच सांपडेल. शूचिर्भूतता, सकाळच्या रामप्रहरीं देहशुद्धी करणें हें आपल्या सनातन धर्मांतच आढळेल. इतर कोणत्याही धर्मांत नाहीं. आपण सकाळीं स्नान झाल्यावर देवपूजेला बसतों. नेहमींच्या सरावाप्रमाणें हातून क्रिया घडत असतात. देवधुणें, गंध, अबीर, गुलाल, अक्षता, फुलें वहाणें वगैरे क्रिया गिरण्यांतील यंत्राप्रमाणें सहज घडत असतात इतकेंच नाहीं तर रामरक्षा, व्यंकटेश स्तोत्र, गुरुचरित्र,

शिवलीलामृताचा अकरावा अध्याय वगैरे मुखोद्गत असल्यामुळें तोंडाची बडबड अव्याहत चालूच असते; हात चालू असतात, तोंड चालू असतें पण ध्यान–मात्र तें कुठें असतें कोण जाणें. तें वाऱ्यावर भटकत असतें. मामा वेरेरकरांच्या सत्तेच्या गुलाममधील हेरंब करीत असलेल्या पूजेच्या सीनप्रमाणें बहुतेकांची पूजा आटोपते. सांगा, संतजनहो, ज्यानें त्यानें आपापल्या मनाचा कानोसा घ्यावा आणि मन काय सांगतें तें पहा. तात्पर्य काय तर आपलें मन त्या पूजाप्रसंगांशीं, देवाची मूर्ति डोळ्यांसमोर असून सुद्धां, तद्रूप करण्याचा प्रयत्न आपल्याकडून होत नाहीं.

श्रीसद्गुरु रामदास स्वामींनीं केवढें मोठें काव्य केलें आहे हो. या मनाकरतां, मनाला किती बोध केलाय त्यांनीं ! आणि त्यांत देखील ते कबूल करतात—

**" अचपळ मन माझें नावरे आवरितां ।**
**तुजवीण शीण होतो धांवरे धांव आतां ॥ "**

तसेंच, " अचपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।

केवढा आहे हा मनाचा प्रताप ! या मनानें मोठमोठ्यांनाही सहज सहज गमतीनें, अगदीं नकळत, जाग न देतां, हुलकावण्या दिल्या !!

" अन्यं मनुष्यं हृदयेन कृत्वा । अन्यं ततो दृष्टि भिराह्वयन्ति ॥ "

याचा गुरुवर्य कै. देवल मास्तरांनीं मराठी अनुवाद केला आहे तो, " एकावरी मन ठेऊनी नेत्रीं खुण करिती दुसऱ्याला " असो एकावर मन ठेवून दुसऱ्याला खूण करणाऱ्या बायांची म्हणजे धंदा करणाऱ्या वेश्यांची उपमा मी या मनाला देईन ! हातानें पूजेच्या सर्व क्रिया घडत असतात, उघडे डोळे समोरचा देव्हारा व त्यांतील देव वगैरे सर्व पहात असतात, तोंड आपल्या बडबडण्यांत मग्न झालेलें असतें, पण मन मात्र या नायकिणीच्याप्रमाणें कुठेंतरी आणि कोणच्यातरी विचाराच्या आहारीं जाऊन त्यांतच गर्क असतें. एक कुटुंबवत्सल गृहस्थ होते. त्यांनाही असली देवपूजेची नेहमींची संवय होती. एके दिवशीं नेहमींप्रमाणें ते पूजेमध्यें असतांना, त्यांचें मूल लागलें पाळण्यांत रडायला, रडणें थांबेना. थांबेल कसें ? त्या बाळाची आई होती आपल्या गृहकृत्यांमध्यें मग्न झालेली व तिला बाळाचें रडणें ऐकूं गेलें नाहीं, पण मुलाच्या रडण्याचा आवाज पूजा करीत असलेल्या गृहस्थांच्या कानावर पडला. झालें, बुवाचें मन गेलें पोराकडे; हातानें काम चाललेंच आहे. तोंडानें बडबड चालूच आहे पण मन ? मुलाचें रडणें जोरांत होऊं लागलें. त्याबरोबर त्यांनीं बायकोस हांक मारली, " सगुणे, काय करतीयास तकड ? बाळ रडतोय् घेना त्येला." बिचाऱ्या माऊलीनें सोडलें हातचें काम व धांवली बाळामागें. घेतला बाळाला जवळ. तरी बाळाचें रडणें चालूच. " अग पाजना त्येला. " " पाजल्येंय त्येला " तरी रडणें थांबेना. मग मात्र गृहस्थाचा पारा चढला. " काय ग. पुजा करतोंय् मी, दिसत नाहीं का तुला. लाव त्येला थानाला, पाज त्येला, कर गप्प. " " बघतांय तर खरं मी त्येला

थानाला धरलाय् पन पितच नायना. " "काय पीत नाहीं, त्येचा बाप पील " असो. तात्पर्य काय, हा मनाचा प्रताप.

**मन हें आवरेना । कीं वासना वावरे सदा ॥**
**कल्पना धांवते सैरा । तस्मात् बुद्धि दे रघुनायका ॥**

मनाचा जोर हा इतका अजस्र आहे कीं, मी मी म्हणणारे संत साधुजनसुद्धां त्याच्या जोरकसपणाची कबुली देतातच. विश्वामित्रासारखा तपस्वी, अहो अंगच्या तपोबळानें ज्यानें प्रतिसृष्टी निर्माण केली तोच विश्वामित्र मनाच्या स्वाधीन झाला, आणि कुत्रा होऊन पळत सुटला हो एका बाईच्या मागें. वसिष्ठासारखा ब्रह्मनिष्ठ मनुष्य की ज्याच्या ब्रह्मनिष्ठेला जगांत तोड नाहीं, पण असा माणूस सुद्धां मनाच्या स्वाधीन झाला. आणि प्रत्यक्ष स्वतःच्या सुनेवर !

एकदां शिरडी येथें, श्री साईबाबांकडे एक रामदासी आला होता. तो मशिदी-समोरील मंडपांत आपल्या पोथ्यांचें बाड उघडून मारे मोठमोठ्यानें पढत होता. श्री साई मशिदींत बसले होते ते एकाएकीं म्हणाले, " अरे रामदास जरा दुकानांत जाऊन दोन पैशाची सोनामुखी घेऊन ये, माझ्या पोटांत लई दुखतें " रामदासी दुकानांत गेला ही संधी पाहून ' बाबा ' स्वतः उठले व त्या रामदासाच्या पोथ्यांतून विष्णुसहस्रानामाची पोथी आणून, शामा ( माधवराव देशपांडे ) यांस दिली.

रामदासी आला. तो आपली विष्णुसहस्रानामाची पोथी, शामाच्या हातीं पाहून संतापला आणि श्री साईच्या समवेत शामाला अद्वातद्वा बोलूं लागला. भांडण विकोपास गेलेलें पाहून, श्रीबाबा, रामदासास म्हणाले, अरे, तुला तुझा राग आवरता येत नाहीं, तुझें मन तुला ताब्यांत ठेवतां येत नाहीं तर हा एवढा खटाटोप कशाला, आणि म्हणे मी रामदासी ! "

या अशा बलवान मनाला वेसण घाला आणि खेंचून आणून एका ठिकाणीं, म्हणजे या परमेश्वराच्या चरणांजवळ बांधून ठेवा. आणि मग तुम्हांला काय दिसेल सांगूं ?

**मन हें निश्चळ आलें एका ठाईं । मग उणें कांई तया सुखा ॥**

प्रल्हादबुवा बडवे या नांवाचे एक सत्पुरुष या महाराष्ट्रांत होऊन गेले. सगळ्या पृथ्वीवर श्रेष्ठ संस्काराच्या बाबतींत आमचा भारत श्रेष्ठ आहे, आणि साधुसंतांच्या बाबतींत संपन्न व सुपिक आमचा महाराष्ट्र. या महाराष्ट्रानें आम्हांला कितीतरी मार्गदर्शक दिले. त्यांतलेच हे बडवेबुवा. त्यांनीं देवाजवळ काय मागितलें असेल हो !

**देवा नलगे तुमचें कांहीं हो । चंचल मन हें निश्चल होऊनी**
**विनटो तुमचे पायीं हो ॥**

मला मुलगा होऊं दे, मला पैसा मिळूं दे, मला मानमान्यता लाभूं दे म्हणून कांहीं न मागतां मागितलें काय ! तर चंचल असणारें हें मन निश्चल होऊन देवा

तुमच्या चरणीं जडूं दे. भक्तजनहो आणि जर का हें एवढें एकदां साध्य झालें कीं मग? एकदां का मनाची झेंप या पांडुरंगाच्या चरणावर पडली कीं मग,—

**येथें सुखाचिया अमूपचि राशी।**
**पुढें कल्पनेशीं ठाव नाहीं॥**

कल्पना सुसरीनें कितीहि उड्या मारल्या तरी, छे: मग हे आमचे मनरुपी गणराज आपले कान हालवायला जरा सुद्धां तयार होणार नाहींत.

**सुखाचें आतिलें साजिरें श्रीमुख।**
**शोक मोह दुःख पहातां नाहीं॥**

पांडुरंगाच्या चरणांवर बुद्धि केंद्रींत झाल्यावर मग इतरांचा कोण केवा ? याच स्थितीला ब्रह्मानंद स्थिति म्हणतात. ब्रह्मानंदी टाळी लागल्यावर तिथें देहाची पर्वा नाहीं, तिथें जगांतील इतर आधीव्याधींची जाग कुणाला येणार हो ?

वाल्मीक ऋषींची कथा सर्वश्रुत आहेच. नारदाच्या उपदेशानें बिचारे रामराम करीत जे जेठा मारून बसले ते स्वतःला विसरले, इतके कीं, त्यांच्यावर मोठें वारूळ झालें. इतकें मोठें वारुळ झालें कीं, बिचारा ऋषि त्यांत गडप झाला. परमेश्वराच्या ठिकाणीं मनाची तदाकारवृत्ति ही अशी झाली पाहिजे.

आपण सारेजण संसारी आहोंत. संसाररुपि समुद्राच्या अवाढव्य पसाऱ्यांत आपण डुंबकळत आहोंत आणि जिकडे नजर टाकावी; तिकडे परिस्थितीच्या भेसूरपणाचें पाणीच पाणी दिसत असून कोठचीही तड, कोणताही किनारा नजरेच्या टप्प्यांत येत नाहीं. हिंमतीचे हिमालय उभारून, प्रयत्नांची पराकाष्ठा करून, अहोरात्र जिवाची धडपड करूनसुद्धां तरणोपाय नाहीं; हें एकदां समजून आलें कीं मग आपण कुठच्या तरी दुसऱ्या मार्गाला लागतों. कुणी सट्टा, कुणी रेस, कुणी जुगार तर कुणी हा असला देवाचे पाय धरण्याचा रस्ता पकडतात. या भक्तिमध्येंही जाहिरातबाजीनें भक्ति करून स्वतःच्या शिष्टपणा मिरवणारे लोक आहेतच. आपण पाहातोंच नाहीं का ? वर्षातून चार वेळां पंढरीला जातों, काशीला पांच वेळां गेलोय, सेतुबंध रामेश्वर पाहिला, नाशिक पंचवटी, आळंदी पाहिली, झाडून साऱ्या तिर्थांची, क्षेत्रांची नामावळ ऐकून घ्यावी. तसेंच मठ बांधला, देवळाचा जीर्णोद्धार केला, देऊळ बांधलें, धर्मशाळेला देणगी दिली वगैरे वगैरे सांगणारे भक्त आपणांस नेहमींच दिसतात. माझा सांगण्याचा उद्देश काय ? कीं, भक्तजनहो, आपल्या मनांत वसत असलेल्या या स्वतःबद्दलच्या अहंपणाच्या दुष्ट वासना जोंपर्यंत आपण वुजून घालविल्या नाहींत, पूर्णपणें जाळून टाकल्या नाहींत, तोंपर्यंत या देखाव्याच्या देहदंडानें काय होणार ? समुद्र किनाऱ्यावर ध्यान धरून बसणाऱ्या बगळ्यांत व अशा भक्तांत कसला फरक आहे सांगा. म्हणून माझें हात जोडून, पायापडून सांगणें आहे कीं, अशा पद्धतीनें भक्ती न करतां, निर्मळ चित्तानें, मन शुद्ध करून, अहंकार विकार भावनेनें देवाचे चरण धरा, नाहीं तर मनाला

आवर न घालतां जर कोणत्याहि तीर्थांत डुंबलास किंवा देवळांतच राहिलास तरी काय बरें उपयोग त्याचा ?

**त्रिवेणी संगमीं नाना तिर्थी भ्रमी ।**
**चित्त नाहीं नामीं तरीं तें व्यर्थ ॥**

या संतोक्तिप्रमाणें शेवटीं हेंही नाहीं आणि तेंही नाहीं व शेवटीं नशिबीं परिटाच्या दगडाची स्थिति.

नेवाळकरांनीं लिहिलेल्या मनोविजय नाटकांत त्यांनी या देहपुरीमध्यें दोन मनांचें वास्तव्य दाखविलें आहे. एकाला मन म्हणून दुसऱ्याला विवेक म्हटलेंय् त्यांनीं. पटलें का आपणाला तें ! स्वानुभव काय सांगतो बघा. त्यांतच त्यांनीं तुमच्या हातून घडणारी कोणतीही गोष्ट तुम्हीं शुद्ध मनानें करतां आहांत किंवा नाहीं तें तुमचें मनच तुम्हांला सांगूं लागते असें लिहिलें आहे.

मुंबईमध्यें होणारे सार्वजनिक सत्यनारायणाच्या महापूजेचे प्रकार आपणांपैकीं बहुतेकांनीं पाहिले असतील. आपल्यापैकीं कित्येक असल्या होणाऱ्या पूजेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद असतील. रावसाहेब सांगाना, त्या पूजाप्रकारामध्यें हे लोक सत्यनारायणाची किती ओढाताण करतात ती. तोच प्रकार सार्वजनिक गणपती उत्सवाचा; नवरात्रभवानी महोत्सवाचा. मेळे, संवाद, गायन, काव्यगायन, हळदीकुंकू, हारतुरे समारंभ या गडबडींत या आमच्या देवाजवळ दिवा आहे किंवा नाहीं हें बघायला कुणाला फुरसत ? आमचे गणोबा म्हणजे पोरांचें खेळणें झालेंय् हें तुम्हीं पहातच आहांत. सगळया उत्सवांत बिचाऱ्या गणपतीएवढे कुणाचेच हाल होत नसतील ! या चालू राजवटींत बिचाऱ्याला महात्माजी म्हणून बसावें लागतें आणि आपली खूण जी सोंड, ती लहान मुलाच्या नाळाप्रमाणें म्हणजे ओळख पटावी म्हणूनच धारण करावी लागली. शिवाय या देवाच्या नांवानें, “ हे कोण हो चाळीचे मालक, या वाडीचे मालक, घाला हार त्यांना, हे कोण हो कार्पोरेटर, घाला हार त्यांना ” म्हणजे सांगावयाचें काय कीं या यातायातींत वेळीं देवाचे हाल करून सुद्धां हे कार्यकर्ते स्वतःच्या वडेजावीला जपतात, स्वतःचा स्वार्थ साधतात. स्वतःचा मोठेपणा लोकांसमोर दिसावा म्हणून धडपडतात. सांगा, यांत देवपूजा, देवभक्ति अगर देवार्चन दिसतें का कुठें ? अशा दांभिकवृत्तीनें जगाच्या डोळ्यांत येण्यासारखी देवपूजा अगर भक्ती न करतां महाराजांच्या उपदेशाप्रमाणें.

**‘ करावी ते पुजा मनेंची उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥**
**कळावें तयासी कळे अंतरीचें । कारण तें सांचे साचा आंगीं ॥**

म्हणून बापहो, परमेश्वराची सेवा करतांना, मनामध्यें कसल्याही कल्पनेला थारा न देतां केली पाहिजे, गाजावाजा न करतां केली पाहिजे. ज्याला तुमची पूजा मान्य व्हायची असेल तो तुमचें अंतःकरण पाहिल्यानें पहातो. नाहीं तर दांभिकपणाचें फळ पदरांत नक्की पडायचेंच. असो.

ज्या श्रीहरीनें माझ्यासारख्या अज्ञ पामराला हें एवढें लिहिण्यास बुद्धि दिली, त्या श्री सच्चिदानंद साईनाथ गुरूंच्या चरणीं माझी बुद्धि, काया व मन अर्पण करून आज इथेंच आटोपतें घेतों.

**॥ बोलीलीं लेंकुरें। वेडीवांकुडी उत्तरें ॥**
**॥ क्षमा करा अपराध। महाराज तुम्हीं सिद्ध ॥**
**॥ नाहीं उच्चारिला। अधिकार म्या आपुला ॥**
**॥ तुका म्हणे ज्ञानेश्वर। राखा पायांचे किंकरा ॥**
**॥ ज्ञानेश्वर माऊली। ज्ञानराज माऊली। तुकाराम ॥**
**॥ साईनाथ गुरु माझे आई। मजला ठाव द्यावा पायीं ॥**

बाबांचा वाघ्या
३०-८-५०

## जया मनीं जैसा भाव........॥

श्रीसाईबाबांच्या आरतींत वरील चरण आहेत हें आपणां सर्वांच्या परिचयाचें आहे. तुम्हीं कोणताही देव माना पण त्याच्यावर जर आपला भाव-भक्ती-विश्वास नसेल तर देवाचा देवपणा आपणांस कधींच कळून येणार नाहीं. पुष्कळ नास्तिक म्हणवून घेणारे लोक असेंच संकटांत असतां विश्वास नसतांही देवाचा धांवा करतात (तो फक्त देव आहे कीं नाहीं हीच परिक्षा पहाण्याचा त्याचा मानस असतो) पण देव कांहीं त्याच्या संकटकालीं धांवून येत नाहीं म्हणून "देव वगैरे सर्व थोथांड आहे" असा डांगोरा पिटतात. पण हें व्यर्थ आहे. **देवावर थोडा विश्वास ठेवा कीं तो तुम्हांला तुमच्या विश्वासाच्या हजारपटीनें तुमच्यावर विश्वास ठेवील व तो तुम्हांला जवळ करीलच करील.** प्रत्येक काळाचे, प्रत्येक पिढीचे देव निरनिराळे असूं शकतात त्याप्रमाणें आज अपला देव श्रीसाईबाबा हाच आहे. व त्याच्यावर ज्यांनीं विश्वास ठेवला त्यांना त्याप्रकारचें बक्षीस मिळालें, मिळत आहे व मिळेलही.

अशाच प्रकारची एक गोष्ट माझ्या वाचनांत कांहीं वर्षांपूर्वी एका इंग्रजी पुस्तकांत आली होती. त्यांत विश्वासाचें फळ कसें मिळत असतें हें सुंदर तन्हेनें दाखविलें आहे. त्या गोष्टीचें जसेंच्या तसें भाषांतर करायला ती गोष्ट आज माझ्यापाशीं नाहीं पण बहुतेक गोष्ट लक्षांत असल्यानें त्यांत कांहीं माझे शब्द घालून श्रीसाईलीलेच्या वाचकां-पुढें ठेवीत आहें. ती आपणांस आवडेल अशी खात्री आहे.

फार वर्षांपूर्वींची गोष्ट आहे ही. एका खेडेगांवीं एक श्रीमंत ब्राह्मण रहात होता. सत्याच्या मार्गानें चालून श्रीमंत होणारा मनुष्य विरळा ! बहुतेक श्रीमंतांची श्रीमंती त्यांच्या पापी कृत्यांनीं कलंकित होऊनच शोभत असते. तशाच प्रकारची श्रीमंती या ब्राह्मणाजवळ कलंकित होऊन शोभत होती. त्या गांवांत त्याची बरीच शेती असून तो सावकारीही करीत असे. त्याच्या श्रीमंतीचा कळस वाढविणारे जे आधारःस्तंभ

यांना तो अक्षरशः ढळांढळां रडावयास लावीत असे, व त्यांतच त्यास आनंद वाटत असे. जें दुसऱ्याचें दुःख तो याचा आनंद असा हा आसुरी आनंद भोक्ता होता. शेतांत पीक कितीही येवो, पण आपला खंड वेळेवर पोंचता झाला पाहिजे असा त्याचा दंडक असे. देवाची कृपा असली कीं योग्य पाण्यापावसामुळें शेती भरपूर येई, पण नेहमींचे दिवस सारखे नसतात. कधीं अवर्षणामुळें तर कधीं अतिवृष्टीमुळें त्या बिचाऱ्यांच्या प्रयत्नांस कमी यश येऊन एखादें वर्षी धान्य कमी येई व या पोटासाठीं दिवसरात्र काबाडकष्ट करणाऱ्या शेतकरी कुळास आपल्या पोटावर मारून आपलें धान्य सावकारास खंड म्हणून द्यावें लागे; कारण तो शेतकऱ्यांची कोणतीहि गाऱ्हाणीं ऐकण्यास तयार नसे. खरोखर जे श्रीमंतीच्या चष्म्यांतून या जगाकडे पाहतात त्यांना या जगांतील गरिबांची दुःखें दिसत नाहींत कीं काय कोण जाणें! शेवटीं तें धान्य कर्जाऊ म्हणून त्या ब्राम्हणाकडून आणावें व पोटाची भूक शमवावी असा त्या शेतकऱ्यांचा जीवनक्रम चालला होता. त्याचप्रमाणें हा ब्राम्हण, व्याजाचा भरमसाट आकार करून गरजूंना जळूप्रमाणें शोषणाऱ्या सावकारीचा धंदा करीत असे. गरीब अडाणी कुळांस हिशेब कळत नाहीं त्याचा फायदा हे सावकार लोक घेत असतात. त्यांनीं आपलें कर्ज मुद्दलाच्या दामदुप्पट फेडूनही या सावकारांचें कर्ज जेवढेंच्या तेवढें डोक्यावर असतें. मुदत संपली या सबबीवर तो त्यांच्या घरादारांचा लीलाव करून, त्यांच्या बायकांमुलांस आकाशाच्या छायेखालीं वणवण फिरावयास लावून तो त्या कुळांच्या बायकामुलांचे शुभाशिर्वाद (!) घेत श्रीमंतीच्या शय्येवर पडलेला असे. शिवाय हातांतील खेळता पैसा मनुष्यास कुमार्गास न लावील तरच नवल!

अशा प्रकारें तो ब्राह्मण आपल्या पापाचे घडे भरीत होता पण दुर्दैवाचा फेरा कोणास कसा व कोठें फिरवील कांहींच सांगतां येत नाहीं. एका वर्षी सांथीच्या रोगांत त्याच्या घरांतील बायकामुलें काळानें एका पाठोपाठ ओढून नेलीं व जगाचा अनुभव घेण्यास याच्या दुर्दैवानें याला इथेंच ठेवलें. आतां तो घरांत एकटा–एकटाच होता. एके काळीं मुलांनीं गोकुळासारखा वाटणारा वाडा त्याला आतां स्मशानासारखा वाटूं लागला. गांवांतील तीं उघडीं–नागडीं गरिबांचीं मुलें पाहून याला आपल्या मुलांची आठवण येई व भडभडून येई व आपल्या दुर्दैवाला दोष देत अश्रु गाळीत बसे. ज्या शेतकऱ्यांस त्यानें अश्रु गाळावयास लाविलें होतें ते त्याचे अश्रु पुसावयास येत. ते त्या ब्राह्मणाची समजूत करीत पण आठवणीचे आवेग त्याला असह्य होत.

दुःखावर काळासारखें अमोघ औषध नाहीं. दिवस उगवत व मावळत. कांहीं दिवस लोटले. त्या ब्राह्मणाचें दुःखही कमीकमी होऊं लागलें. आपण या लोकांस छळलें त्यांचें प्रायश्चित आपणांस परमेश्वरानें दिलें. काबाडकष्ट करून उपाशीं राहाणाऱ्या पोटांनीं दिलेले शाप आपणांस भोंवले असें त्यास वाटूं लागलें. त्याला आतां कशांतच सुख वाटेना.

अश्रूला अश्रु ओळखूं शकतात. त्याप्रमाणें त्या गरीब कुटुंबांचीं दुःखें आतां त्याला दिसूं लागलीं. शेतकऱ्यांची परिस्थिति समजूं लागली. या लोकांनीं इतके कष्ट

करून दुःखांत दिवस काढावे व त्यांच्या कष्टावर आम्हीं सुखांत लोळणारीं, या समाजांतील बांडगुळेंच नाहीं काय ? अरेरे... परमेश्वरा, तूं मला हें अगोदर दाखवून दिलें असतेंस तर ? परमेश्वरा ! तूं दाखविलें असतेंस तरी मी पहायला तयार नव्हतों त्या वेळीं, कारण माझी दृष्टि त्यावेळीं पैशांच्या–श्रीमंतीच्या मदानें धुंद झाली होती. त्यावेळीं मी स्वप्नांत दंग होतों पण आतां खडखडीत जगा झालों आहें. हें असलें जिणें मला टाकून दिलें पाहिजे. आजपर्यंत या लोकांवर केलेल्या अपकारांचें अंशतः तरी परिमार्जन करावयास पाहिजे. तें कसें करावें बरें ? तो विचार करूं लागला.

एके दिवशीं एक साधू त्या गांवांत आला. संध्याकाळची वेळ. तो साधू त्याच गांवांत वस्तीस राहिला.

खेडेगांवांत दिवसाकाठीं दमून भागून आलेले लोक रात्रींचीं जेवणें वगैरे झालीं कीं गांवांतील एखाद्या चवाठ्यावर अगर देवळांत शिळोप्याच्या गप्पा मारण्यासाठीं जात असतात. एकमेकांस भेटण्याची, आपल्या सुखदुःखाच्या चार गोष्टी सांगण्याची व थोडीशी करमणूक करण्याची त्यांना हीच वेळ योग्य असते. सध्यां तो ब्राह्मणही त्या तेथें जात असे. त्याप्रमाणें त्या दिवशीं तेथील लोक शंकराच्या देवळांत जमले होते. तो साधुही तेथेंच उतरला होता. लोकांचें लक्ष त्या साधूकडे गेले व ते त्याची विचारपूस करूं लागले. शेवटीं त्यांनीं दोनचार परमार्थाच्या गोष्टी सांगण्यास त्याला विनंती केली. आपल्या आवडीच्या विषयाचा मोका मिळाल्यावर कोणता माणूस आढेवेढे घेईल ? त्या साधूसही आनंद झाला व त्यानें परमेश्वराच्या लीलांचे गुणवर्णन करण्यास सुरवात केली. आपले निरनिराळे अनुभव सांगितले. परमेश्वर भक्तांची कशी कसोटी पाहतो व कसोटीस उतरलेल्या भक्तांचा तो कसा दास बनतो हें निरनिराळे अनुभव देऊन वर्णन केलें. तो ब्राह्मणही त्यावेळीं तेथें होता. आपणांस आपला पुढचा मार्ग हाच सांगूं शकेल असें त्यास वाटलें. तो जागेवरून उठला व त्याचे पाय धरून त्यावर अश्रुविमोचन करूं लागला. साधूनें त्यास हातास धरून उठविलें व म्हणाला, "कां बेटा, कशाला रडतोस ?" त्यानें आपली सर्व कहाणी त्यास सांगितली व विचारलें "मला आतां हें असलें जीवन नको आहे, व या पापांतून मुक्त होण्यास कोणता मार्ग स्वीकारूं ?'

साधु म्हणाला, "पश्चातापेत शुद्धते !" तूं पश्चातापानें शुद्ध झाला आहेस तरी या संसाराचा तुला वीट आलेला आहे असें म्हणतोस तर त्या पवित्र गंगामातेजवळ जा व तिच्यांत स्नान कर मग तूं पापांतून व जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होशील."

गंगानदी केवढी व कोठें असते हें त्या खेडेगांवांतील ब्राह्मणास माहीत नव्हतें म्हणून त्यानें परत विचारलें, "महाराज, गंगा नदी कोठें आहे ?"

"सरळ उत्तरेकडे जा, तेथें तुला गंगा भेटेल."

यानें गंगेच्या स्नानास जाण्याची तयारी केली. आपला रहाता वाडा व शेतीभाती आपल्या कुळांच्या हवालीं केली व सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन तो निघाला. तो सरळ उत्तरेकडे तोंड करून चालत होता. कांहीं दिवसांनंतर त्याला एक ओढा मिळाला.

त्याला वाटलें हीच ती गंगानदी असावी. तो येथें राहून त्या ओढ्याचें स्नान करूं लागला. अशीं याचीं दोन वर्षें गेलीं. एक दिवस तो त्या ओढ्यावर आंघोळीस चालला असतां त्यास एक वाटसरू भेटला. त्यानें विचारलें,

" कां हो भटजी, सकाळींच कोठें निघालेत ? "

" गंगेवर आंघोळीला...... "

" ऑं ! गंगेवर आंघोळीला ? इथें गंगा कुठें आहे ? "

" ही दिसते ती नव्हे गंगा ?" भटजी.

" अरे बाबा तिला गंगा म्हणणारा तूं वेडा असला पाहिजेस, तो एक लहानसा ओढा आहे. गंगेचें पात्र याच्यापेक्षां मोठें आहे. "

" ही असेल लहान गंगा, आपण आतां मोठ्या गंगेंत जाऊन स्नान करूं " असें म्हणून तो ब्राह्मण उत्तरेकडे चालूं लागला. कांहीं दिवसानंतर त्याला एक नाला लागला. त्याचें पात्र ओढ्यापेक्षां मोठें होतें. त्याला वाटलें हीच गंगा असली पाहिजे. शेवटीं तेथेंही गंगेचें पात्र याहूनही मोठें असतें असें त्यास कळलें म्हणून तो आणखी उत्तरेकडे निघाला. शेवटीं त्याला एक नदी लागली. तिचें पात्र नाल्यापेक्षां विशाल होतें.

" अहाहा ! हीच ती गंगा माता असली पाहिजे " ब्राह्मण आनंदानें उद्गारला व तो तेथें राहून स्नान करूं लागला. एके दिवशीं एक फकीर त्या नदींत आंघोळ करण्यासाठीं आला. त्याला पाहून ब्राह्मण म्हणाला, " महाराज आपण कोणत्या पापक्षालनाकरतां या नदीवर स्नानास आलांत ? "

त्या बैराग्याला हा प्रश्न ऐकून आश्चर्य वाटलें व तो त्याच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागला.

" असे आश्चर्यानें काय पाहतां तुम्हीं माझ्याकडे ? " ब्राह्मण.

" तूं काय म्हणतोस तेंच माझ्या लक्षांत येत नाहीं " फकीर.

" म्हटलं, आपण गंगेवर स्नानास कां आलांत ? "

" ही गंगा म्हणून कुणी सांगितली तुला ? "

" हिच्याहून आणखी मोठी गंगा आहे का ? " ब्राह्मण.

" अरे ही तर एक साधी नदी आहे. गंगेचें पात्र तर याच्याहून विशाल आहे. तुला गंगेंत स्नान करावयाचें असेल तर सरळ उत्तरेकडे जा. तेथें तुला गंगा मिळेल. "

नंतर त्या ब्राह्मणानें गंगेच्या शोधार्थ उत्तरेकडे कूच केलें. कांहीं दिवस चालल्यानंतर त्याला पूर्वीच्या नदीपेक्षां एक विशाल पात्र असलेली मोठी नदी मिळाली. ती गंगाच असली पाहिजे असें समजून तो तेथें राहून स्नान करूं लागला.

ज्या साधूनें त्याला गंगेंत स्नान कर म्हणून सांगितलें तोच साधु फिरतां फिरतां एक दिवस तेथें आला. त्याला पाहून ब्राह्मणास आश्चर्य वाटलें व म्हणाला, " काय महाराज ! इकडे कुणीकडे आपण ? "

" अरे, आमचा पाय काय स्थिर असतो होय ! निरनिराळ्या गांवांत जाऊन परमेश्वराच्या नांवाची जागृति करावी असा आमच्या गुरूचाच आम्हांला संदेश आहे त्यामुळें हें असें फिरावें लागतें. पण आपण इकडे कुठें ? "

" वा ! तुम्हींच तर पापक्षालनास गंगेचें स्नान कर म्हणून सांगितलें; म्हणून लहान लहान गंगेपासून सुरवात करून आतां या मोठ्या गंगेंत आलों आहें. "

नंतर त्यानें आपली सर्व हकीगत त्या साधूस सांगितली. ती ऐकून साधू म्हणाला, " तुझी प्रगति उत्तम आहे. पण तुला मी ज्या गंगेचें नांव सांगितलें ती गंगा या उत्तरेकडील दिसणाऱ्या धुरकट डोंगरांच्या पलिकडे आहे. तिचें पात्र या नदीपेक्षांही विशाल आहे, व तें इतकें मोठें आहे कीं तुझी नजर एका टोंकावरून दुसऱ्या टोंकास भिडणार नाहीं. "

तेव्हां त्यानें तेथूनहि त्या गंगेकडे जाण्याचें ठरविलें. पण आतां त्याचें वय झालें होतें. गंगेच्या शोधांत त्याचीं पंधरा वर्षे गेलीं होतीं परंतु त्याला गंगा मिळाली नव्हती. पण त्याचें मन वयाकडे लक्ष द्यायला तयार नव्हतें. तो कसाबसा प्रवास करीत चालला होता. दिवस हळू हळू पुढें लोटत होते. काळ पुढें चालला होता. त्याचें शरीर थकत चाललें होतें पण मनाच्या उत्साहामुळें त्याचा प्रवास अखंड चालला होता. डोंगर जसजसा जवळ येत होता तसतसा त्याचा उत्साह वाढत चालला होता. पण त्याची शारीरिक शक्ती क्षीण होत चालली होती. शेवटीं तो त्या डोंगरपायथ्याशीं तर येऊन पोहोंचला.

अंगांत त्राण नसता केवळ गंगानदीचें एकदां तरी स्नान करतां यावें म्हणून त्यानें डोंगर चढण्यास प्रारंभ केला. आतां त्याचा प्रवास मंद चालला होता. शेवटीं तो त्या डोंगराच्या माथ्यावर आला व त्याला तें गंगेचें विशाल पात्र दिसूं लागलें. त्यांत ते स्नान करणारे साधू व पाण्यावर विहार करणारा पक्षिगण पाहून त्याला आनंद झाला पण आपण यापुढें एकही पाऊल टाकण्यास समर्थ नाहीं हें पाहून त्यास वाईटही वाटलें.

शेवटीं तो गंगेकडे तोंड करून व हात जोडून म्हाणाला, " गंगामाते, तुझ्या-पाण्याचें स्नान करणारे खरोखरच धन्य होत. तुझ्याकडे येण्यासाठीं फार कष्ट सोसावे लागतात. पण मी प्रत्येक वेळीं तूंच ती गंगा असें समजून निरनिराळ्या नद्यांतून स्नान केलें. मी तुझा पुरा शोध करायला पाहिजे होता. पण या पंधरा वर्षांत तुझ्यासारख्याच लहान लहान नद्यांतून स्नान करीत आलों. त्याही तुझ्या बहिणी असतील. पण आज माझ्या शेवटाच्या क्षणीं तूं मला फक्त डोळ्यांनींच दिसत आहेस. मला गंगामाता नुसती पहाण्याचें तरी पुण्य मिळो " असें म्हणून त्यानें आपला देह तेथेंच ठेवला.

[ स्वर्गांत पोहोंचल्यावर तेथें एक न्यायकोर्ट आहे. तेथील न्यायदेवतेसमोर मृत्यु-लोकांतून गेलेल्या मनुष्यास उभा करण्यांत येतो व तेथें त्याच्या पापपुण्याची यादी वाचून दाखविण्यांत येते व न्यायदेवता योग्य तो न्याय देऊन त्याला स्वर्गांत अगर नरकांत पाठवीत असते. ]

या ब्राह्मणास न्यायदेवतेसमोर यमदूतांनीं उभें केलें. न्यायदेवतेनें चित्रगुप्तास विचारलें, " काय चित्रगुप्ता, याच्या नांवावर काय काय आहे ? "

चित्रगुप्तानें त्या ब्राह्मणाच्या नांवाची फाईल काढली व तो वाचूं लागला. त्याचीं तीं पूर्वाश्रमींचीं कृत्यें पाहून न्यायदेवता हळूहळू उग्र होऊं लागली. चित्रगुप्ताचें वाचन चालूच होतें. त्या न्यायालयांतील सर्व देवगणास वाटलें हा आतां खरोखरच नरकांत जाणार.

" पुरे ! पुरे !! याला नरकच योग्य होईल...... " न्यायदेवता बोलूं लागली.

" थांबा महाराज, अजूनही याच्या कृत्यांची यादी शिल्लक आहे. " चित्रगुप्त.

चित्रगुप्त वाचूं लागला, " एका सांथीच्या रोगांत याचीं बायकामुलें मृत्युमुखीं पडलीं, तेंच दुःख याचा जीवन मार्ग बदलूं शकलें. "

" पुढें काय झालें ? " न्यायदेवता जिज्ञासेनें म्हणाली.

" याला आपल्या कृत्यांचा पश्चाताप झाला व या पापापासून परावृत्त होण्याचा मार्ग शोधूं लागला. इतक्यांत एका साधूची गांठ पडली. यानें त्या साधूला पापापासून परावृत्त होण्याचा मार्ग विचारला. साधूनें गंगेचें स्नान करण्यांस सांगितलें. स्नानास जातेवेळीं यानें आपली सर्व धनदौलत, घरदार व जमीनजुमला गरीबांस वाटून दिला व गंगेच्या शोधार्थ निघाला. "

" पुढें " न्यायदेवता स्मित करून म्हणाली.

" अज्ञानामुळें गंगा कुठें व केवढी आहे हें माहित नसल्यामुळें त्यानें गंगा नदी समजून एका ओढ्यावर दोन वर्षें स्नान केलें. नंतर, गंगा यापेक्षां मोठी असते असें समजून आल्यावर तो गंगेच्या शोधास निघाला. एक नाला बघून तीच गंगा असावी अशा समजुतीनें त्यानें तीन वर्षें तेथें स्नान केलें. तेथेंहि खरा प्रकार त्यास समजला व तो परत गंगेच्या स्नानास निघाला. त्याला एक लहान नदी मिळाली तेथें त्यानें ६ वर्षें स्नानांत घालविलीं. तेथेंहि आपली चूक समजून आल्यावर परत गंगेच्या शोधास निघाला. त्यानंतर तो एका मोठ्या नदीरव आला व तेथें तो ४ वर्षें स्नान करीत होता. एके दिवशीं पूर्वीचा साधु याला भेटला व त्यानें या ब्राह्मणास गंगेचा खरा मार्ग दाखवून दिला. त्यावेळीं याचें वय झालें होतें तरी पण फार कष्ट सोसून तो डोंगराच्या पायथ्यापर्यंत आला. आतां त्याच्या आयुष्याचे दिवस भरत आले होते. त्याचा आत्मा हिरावून घेण्यासाठीं यमदूत निघाले होते. शेवटीं याला गंगा दिसली पण पाण्याचा स्पर्शही झाला नाहीं. व तेथेंच त्याचा अंत झाला व आतां तो आपल्यासमोर प्रत्यक्ष उभा आहे. "

" मग याला गंगानदीच्या स्नानाचें पुण्य १५ व्या वर्षी मिळालें तर " न्यायदेवता म्हणाली.

" नाहीं. गंगेचें स्नान तर राहोच पण गंगेच्या पाण्याचा स्पर्शही झाला नाहीं याला. मग पुण्य कसलें ? " कोणी तरी शंका काढली.

" तें तुम्हांला नाहीं कळायचं " न्यायदेवता म्हणाली " त्यानें जरी कुठेंहि स्नान केलें तरी तें आपण गंगेचें स्नान करीत आहोंत या भावनेनें केलें. शिवाय त्यामुळें आपलें पाप धुऊन जाणार हा त्याला विश्वास होता म्हणून तो सर्व व्याप सोडून गंगेच्या शोधास निघाला होता. त्याला त्याच्या विश्वासाचें फळ मिळालेंच पाहिजे. याला मी स्वर्गांत पाठविण्याची आज्ञा करतों. "

न्यायदेवतेनें निकाल दिला व सर्व देववृंदांनीं त्याच्यावर पुष्पवृष्टी केली, आणि क्षणभर एकच आवाज घुमला " गंगामातेचा विजय असो, ब्राह्मणाचा व त्याच्या भावनेचा विजय असो " व न्यायदरबार बरखास्त झाला.

या गोष्टीवरून आपणांस काय दिसून येईल ? ज्याचा जसा भाव त्याला तसें फळ ईश्वराकडून मिळत असतें. शिरडी येथील श्रीसाईबाबांवर आपण जर भाव-प्रेम-विश्वास ठेवाल तर तो कधींच वांया जाणार नाहीं. विश्वासाचें फळ देणें परमेश्वराचें कर्तव्यच आहे व तें कर्तव्य पार पाडण्यास परमेश्वर-श्रीसाई कधींच अनमान करणार नाहीं ही खात्री बाळगा. आपण दररोज नुसती आरती म्हणतों पण ती आरतीची नुसती कवाईत करतों ( आपण जर शिरडीस गेलां असाल तर आपणांस अशीं हातवारे करून कवाईत करणारीं माणसें दृष्टोत्पत्तीस आल्याखेरीज रहाणार नाहींत ) त्या आरतीचा अर्थ ध्यानीं आणून जर त्याप्रमाणें आपण वर्तन केलें तर एक श्रीसाईची आरती आपणांस आज ह्या आणिबाणीच्या वेळीं उपयोगी पडल्यावांचून रहाणार नाहीं ही खात्री असूं द्या.

आपलाः—
श्रीसाई आशिर्वादाभिलाषी
**ना. द. कांदळगांवकर**
मुंबई नं. २८.

---

# ॐ श्री साईनाथ

## श्रीसाईनाथ गण

श्री गणेश साई नंदना रे निगुर्ण निर्विकारा जी जी ॥ १ ॥
निराधार परमेश्वरा प्रसंगी यावें सत्व धिरा जी जी ॥ २ ॥
विनवितो जोडुनि करा रे धांव घेई सभा चातुरा जी जी ॥ ३ ॥
करी स्वारी शामसुंदरा रक्षावें आम्हां दीन लेकरां जी ॥ ४ ॥
श्रीगणेश साई नंदना रे ॥ १ ॥

(चाल २ री)

त्रिभुवन करितो फेरी = गुप्त लहरी जी जी ॥ ५ ॥
भोजनास बसे निरंतरीं = द्वारकापुरी जी जी ॥ ६ ॥
वामकुक्षा निद्रा मनोहरी = चावडीवरी जी जी ॥ ७ ॥
नित्य आवडे शिरडी नगरी = वेश फकेरी जी जी ॥ ८ ॥
श्रीगणेश साई नंदना रे— ॥ २ ॥
कस्तुरी टिळक साजरा रे तुं सकल सिद्धि माहेरा जी जी ॥ ९ ॥
मंगल मूर्ति जगदेश्वरा ठेवावा हस्त शिरावर पुरा जी जी ॥ १० ॥
आरंभि नमितों तुला रे देई मति ज्ञान गंभिरा जी जी ॥ ११ ॥
निरंतर लीन मी पुरा सोडावी साईकृपा माधुरा जी जी ॥ १२ ॥
जनार्दन इच्छितो वरा रे घडो सेवा तुझे दरबारा जी जी ॥ १३ ॥
पूर्वी आवड माझचातुरा विनवितो जोडुनि दोन्हकर जी जी ॥ १४ ॥
श्रीगणेश साईनंदना रे निर्गुण निर्विकारा जी जी ।
निराधार परमेश्वरा प्रसंगीं यावें सत्व धीरा ॥ ३ ॥

## बाबा की पुकार

कहां धुंडूं तुझें । नहि मिलता मुझें । हुवा दिवाना मै तेरे वझे । साई तेरे वझे ॥ १ ॥ सब शहरोमें तुझें थकाया पहाडोमें मुझे नहि मिला पता तेरा दरगासे मुझे । कहां धुंडूं तुझें ॥ २ ॥ लगि चोट मुझे । मिलनेकी तुझे । लगि प्यास तेरे दर्शन की मुझे । कहा धुंडूं तुझे नहि मिलता मुझे ॥ ३ ॥ जब हुवे प्रसन्न अब साई मुझे आकर के दिया दर्शन भमुझे । उपदेश किया समझानें मुझे कहा धुंडूं तुझे नहिं मिलता मुझे ॥ ४ ॥ सदा जनार्दन मांगे तुझे तेरे दरका बनाले गधा मुझे नयनोसे देखुं हमेशा तुझे कहा धुंडूं तुझे नहि मिलता मुझे कहा धुंडूं तुझे नहि मिलता मुझे हुवा दिवाणा मै तेरे वझे ॥ ५ ॥

न मैजतमे रहे न मंदीरमे रहे ईशी चकरमे रखा हमेशा मुझे·

## श्रीसाईबाबांचा पोवाडा

तुम्ही ऐका सभा चतुरा । ज्ञान गंभिरा । वार्ता सुंदरा । अज्ञा कुमारा । गातो सभेंत । साईनाथ राखावी लाज रंग दैवत जी जी । अहमदनगर जिल्हा जाहीर । चार कोस कोपरगांव दूर । अग्निस्थ होतो पहा स्थिर । श्रीक्षेत्र शिरडी नगर ऐकावी मात । अठराशें चौसष्टांत, लग्नाबरोबर आले अवचित

जी जी । उतरले खंडेराव मंदिरी गांवा बाहेरी । पाहे पूजारी 'साई' बाबा नांव पुकारी जोडुनी हात । म्हाळसापति धरोनि हातीं । आणि गांवांत जी जी । अप्पा जागल्या पुकारा करी । वस्तीत वदंता सारी । पाहण्यास येती नरनारी । भ्रांतित गुरफटे सारी । कळेना हित । कुणी निंदा कोणी स्तुति पडे मोहांत जी जी ॥ ( कडवें १ ) तुम्ही. ॥

### चाल दुसरी

ओम् नमो साई ईश्वरा कृपा सागरा । जगत उद्धारा लीली अपार । ताराया भक्त । धरोनि रुप साजरे फकीर गोजरे आले शिरडींत जी जी ॥ चरणीं तेज चमके आपारा । चंद्र सूर्यासि थारा । देति गुरुवरा प्रकाश साजरा । भक्त हृदयांत । दुर्मति पळे आपोआप लहर ध्यानांत जी जी । पोटर सकळ सुंदरा । जणूं सकुमारा । भक्त आधारा । लागता करा । झाले पुनित । पापानें काढिला पळ शांति चित्तांत जी जी ॥ ७ ॥ लंगोट वैराग्य वरा दावि ईशारा । बाल कुमारा । यातचि तरा । आण ध्यानांत । सहज समाधि योग साधे आवचित जी जी ॥ ८ ॥ ( कडवें २ ) तुम्ही.

### चाल पहिली

ब्रह्मरंध्रीं टोप खरा । रुमाल पांढरा । चमकतो हिरा । तेज आपारा । भरे नयनांत । डोलोनि सांगती धरा । मिळा ज्योतीत जी जी ॥ ९ ॥ डावे काखेंत झोळी साजरी । टमरेल करी । भिक्षेची फेरी । त्रिभुवन पोशितो हरी । लागे न अंत। सर्वांचे पुरवि मनोरथ राहोनि गुप्त जी जी ॥ १० ॥ दगडावरती सिद्ध साजरां मशेदी वरा । केला उद्धारा । बीन आधारा टांगला फळा । पाण्याची ज्योत । निरंतर ठेविती धुनी पहा जागृत जी जी ॥ ११ ॥ घोडा समोर श्याम सुंदरा । कौतुकी पुरा । फोडी हंबरा । शिकवी नरा । सोडा भ्रांती । लागावे साईच्या चरणीं पहा प्रचीती जी जी ॥ १२ ॥ ( कडवें ३ )

### चाल दुसरी

आली गंगागीर बाबांची स्वारी । सहत्याची तयारी करी । अष्टो रात्र गर्जना पुरी । नामाची देती हाजरी मांडी वृत्तांत । सर्वांसि देती ईशारा । दाविती रत्न जी जी ॥ १३ ॥ बायजा मातेनें सोहं बाजरी । दळली स्वकरी । करोनी भाकरी । पाटी शिरावरी । फिरे शोधीत । नेमानें आकळलें बाबा केले अंकीत जी जी ॥ १४ ॥ नानासाहेब चांदोरकर । जीर्ण बांधी शीद सत्वर । निशाण निमोणकर । सदा ध्यानांत भाऊ कुंभार रमति गांवांत । नाना वल्ली विचित्र

लिला घ्यांसी सर्वांत जी जी ॥ १५ ॥ बुटी साहेबांची पदवी थोरी । शिरडीची करीती वारी । चुकली जन्ममरणाची फेरी । भक्ताची कसोटी पुरी जाहीर मुलखांत । निरंतर ठेविती बाबा आपुल्या घरांत जी जी ॥ १६ ॥ ( कडवें ४ )

### चाल पहिली

गणू दास भक्त भारी । वर्णवेना थोरी । बांधला हरी । लाक उपकारा कष्ट सोशिन । फिरोनि चारी मुलुखांत जागृति देव जी जी ॥ १७ ॥ माय लक्ष्मुनी सेवा करी । कसोटी पुरी । भरे दरबारी । धरोनी करी । देती हातात । सांभाळी तुला ही सात । ठेवी ध्यानांत जी जी ॥ १८ ॥ काशिनाथ घोड्यावर स्वारी । निघे बाजारी थैली पुरी । नाना समोरी । ठेविती सत्य । बाळा शिंपी चोपदारी । राहोनी नित्य जी जी ॥ १९ ॥ रचिले चरित्र दाभोळकर । गोपाळ इन्स्पेक्टर । भरवी यात्रा मनोहर । राधाकृष्ण आई सुंदर गोड गित गात । चवरी अबदागिरी झळकवी पूजेची साथ जी जी ॥ २० ॥ ( कडवें ५ )

### चाल दुसरी

तात्या पाटलाची गडबड भारी । चिलमीची तयारी सारी । साईसीं धरोनि करी । लेंडीची करीती फेरी आणि यशोदीत । चिरकाल सुखाची जोड साधे अवचित जी जी ॥ २१ ॥ माधवराव वैद्यकी करीं शामा म्हणती बाबा दरबारी । पुरंदरे कुशलता करी भागोजी छाया करी छत्री हातांत नानादेव मारी ललकारी चाले हांसत जी जी ॥ २२ ॥ भाटे साहेबास प्रसन्न हरी । धुमाळ गोदा तिरी । रासन्यास अम्र माधुरी । दिक्षितांचे घरीं कचेरी । चाले झोकांत । दुनियेचे सुटती कोहडे एका घटकेत जी जी ॥ २३ ॥ चक्री भजनाची धरोनि फेरी वाघांची कुशलता पुरी । तमाशांची होति हाजरी । असे खेळ नानापरी चाले आनंदात । सर्वांसी मिळे बक्षीस रोकड हातात जी जी ॥ २४ ॥ ( कडवें ६ )

### चाल पहिली

अबदूल बाबा सेवा करी । रस्त्याची दुरुस्ती पुरी झाडासी पाणी भरी । हंड्यांची रिपेरी सारी करी इतुक्यांत चहूंकडे बांधि फरारे निशाण झोकांत जी जी ॥ २५ ॥ नित्य पाठ कलमाचे करी । बाबा देति नियामत खरी । विडे झेलि वरचेवरी । रंगवी देह अंतरीं । कष्ट सोशीत भाविका येति दर्शना उदीची साथ जी जी ॥ २६ ॥ भक्तीची खरी माधुरी चाखे निरंतरी । तप खडतरी । गावा बाहेरी बसे ध्यानांत । उपासनी नग्न दिगंबर ध्वज फडकत जी जी

॥ २७ ॥ क्रिया कर्म साधले खरी ! मोक्ष पायरी । दान सत्वरी । पिंड स्वकरी देती हातात । सालेरीत चालवी गादी सती गोदावरी माता प्रख्यात जी जी ॥ २८ ॥ ( कडवें ७ )

## चाल दुसरी

एकुणविसशें अठरा अक्टोंबरी । मंगळवारीं । विजया दुपारीं । समाधि निरंतरी देह धरणीत । जगताची करीती फेरी भक्त रक्षित जी जी ॥ २९ ॥ समाधीची वर्णवेना थोरी । भक्तांची गर्दी दरबारीं । नवसासीं पावे सत्वरी देति तीर्थ पळी भरी । प्रसाद हातात । उदी दावी चमत्कार दुरा भावने युक्त जी जी ॥ ३० ॥ आठा दिवसा गुरुवारीं पालखीची तयारी सारी । बाबा नेती चावडीवरी भक्तांच्या झुंडी भारी पडे स्वार्थांत । त्यासी दावी मार्ग पुरा होतो दृष्टांत जी जी ॥ ३१ ॥ केले ओपन संस्थान भारी । झाले मेंबर नाना परी । ट्रस्टीची बसे कचेरी सेक्रेटरी दंग झाले न्याय शोधीत ठेविले सूत्र हातांत चौकशी युक्त जी जी ॥ ३२ ॥ ( कडवें ८ )

काढल्या खोल्या हारोहारी । पायखाने बांधले दुरी । इलेक्ट्रिकची तयारी सारी पावर हाऊस बांधला दुरी लेंडी बागेंत । न्यूनता भासेना कांहीं मनचकीत जी जी ॥ ३३ ॥ पादुका भोयरावरी । दीप जळतो निरंतरीं । निंबाची चवी दुहेरी । उदाची आठवण पुरी ठेवा चित्तांत । एकोणवीसशें पन्नास सालीं कवन रचना झाली अवचित जी जी ॥ ३४ ॥ जनार्दन पवाडा करी नित्य डोकें चरणावरी । बाबांचा धांवा करी । येति लहरा वरचेवरी । आठव चित्तांत साईचा पवाडा गातो मोठ्या प्रेमांत जी जी ॥ ३५ ॥ रहाणार येवले शहरी । धंदा ड्रायव्हरी । कालगती न्यारी । भडकवी फिरवी सूत्रांत । जयहिंद सर्वांसि माझा जोडुनि हात जी जी ॥ ३६ ॥ ( कडवें ९ )

तुम्हीं ऐका सभा चातुरा ज्ञान गांभिरा वार्ता सुंदरा अज्ञ कुमारा गातो सभेंत साईनाथ राखावी लाज रंग दैवत जी जी ।

रचणार.—

**जनार्दन नामदेव गणोरे**

शिरडी

गुरुपौर्णिमा उत्सव ता. २९–७–५०.

रा. रा. जनार्दन नामदेव गणोरे यांनीं लिहिलेला ' श्री साईबाबांचा पोवाडा " छापला आहे. स्वतः अशिक्षित असून व श्री साईस न पहतां, आपल्या आत्मतेजानें

व स्वबुद्धीनें लिहिलेला हा पोवाडा, म्हणजे बाबांची पूर्णकृपा, सेवेकऱ्याला कशी प्राप्त होते हे दिसून येतें. हे शिरडी संस्थानांत नोकरीस आहेत. त्यांची सेवा बाबांकडे रुजू होत आहे, ह्याची साक्षच हा पोवाडा आहे. 'बाबा की पुकार' तर सर्व भक्तांनीं पाठ करून दररोज म्हणावा. कारण हें कवन प्रासादिक व भक्तांच्या हृदयाची साईविषयीं चित्रपट दर्शवते. हा पोवाडा स्वतंत्र छापला आहे व मूल्य ०–३–० आहे. सर्व साई-भक्तांस माझी नम्र विनंती आहे कीं, तो सर्वांनीं विकत घ्यावा व लिहिणाराला हुरूप, प्रोत्साहन द्यावें, ह्यांतच बाबांची खरी सेवा आहे.

संपादक

---

# –: शिर्डीवृत्त :–

## माहे जून १९५०

या महिन्यांत शिरडीस श्रीसाई–समाधी दर्शनास बाहेर गांवचे व आसपासचे बरेच भक्त येऊन गेले. हल्लीं प्रत्येक गुरुवारीं भक्तांची बरीच गर्दी होत असते.

**देणगीः**—या महिन्यांत एकूण २६ भक्तांकडून निरनिराळ्या प्रकारचें कापड, सोन्याचांदीचे जिन्नस वगैरे अनेक प्रकारच्या देणग्या आल्या आहेत. दि ग्रामोफोन कंपनी मुंबई नं. १ यांनीं श्रीसाईबाबांचें भजन असलेली एक रेकॉर्ड अर्पण केली.

**धर्मकृत्यः**—श्रीसंस्थान कमिटीतर्फे, अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य ब्राह्मण, सुवासिनी भोजन व गरीब–अन्न–भोजन वगैरे विधी रोज यथासांग करण्यांत आले. या महिन्यांत पांच भक्तांनीं श्रीमंदिरांत श्रीसत्यनारायणाच्या पूजा घातल्या.

**कीर्तनः**—संस्थान गवई यांची ज्येष्ठ वद्य ११ व अधिक आषाढ शु० ११ अशीं दोन कीर्तनें समाधीमंदिरांत झाली.

**नवल विशेषः**—श्री मार्तंडबुवा पवार मु० औंध. जि. सातारा यांनीं श्रीपुढें शास्त्रोक्त गायनांची हजेरी दिली.

ता. ३०–६–५० रोजीं बँगलोरची लक्ष्मीकांतम नांवाची एक बाई हार्टफेल होऊन निधन पावली. तिचा अंत्यविधी संस्थानचे मदतीनें उरकण्यांत आला.

सभामंडपाचें व विजेचें काम चालू आहे. शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

सेक्रेटरी

**श्रीसाई संस्थान, शिर्डी**

## माहे जुलै १९५०

बाहेरगांवचे व आसपासचे पुष्कळ लोक श्रीसाई समाधीचें दर्शन घेऊन गेले, शिवाय या महिन्यांत गुरुपौर्णिमा उत्सव असल्यामुळें बरेच भक्तलोक उत्सवासाठीं आले होते.

**देणगी**:—या महिन्यांत एकूण ४० भक्तांकडून कपडे, सोन्याचांदीचे निरनिराळे जिन्नस श्रीसाई–संस्थानला देणगीदाखल मिळाले. शिवाय श्री. के. व्यंकट कृष्णय्या नायडू, स्टेशन मास्तर रायचूर यांनीं श्रीसाईचा सोन्याचा पुतळा अर्पण केला. वजन २ तोळे १ मासा. किंमत अजमासें २५० रु. श्री. मदनलाल पोतदार, मारवाडी बाजार–मुंबई यांनीं पितळी २४ वाट्या, २५ फुलपात्रें (पितळी). ३ पितळी ताटें १ तांब्याचा लोटा. १२ पितळी लहानमोठीं पातेलीं, ६ लोखंडी तवे, ९ लोखंडी पकड, ६ लोखंडी चिमटे अशीं अजमासें शंभर रुपयांचीं भांडीं अर्पण केलीं.

सौ. सरस्वतीबाई गजानन गरुडे, २६ साईनिवास, शींव मुंबई २२ यांनीं दोन सोन्याच्या बांगड्या, (वजन १ रु. १३ आणे) किंमत रु. २०४ अर्पण केल्या.

**धर्मकृत्य**:—संस्थान कमिटीतर्फे अभिषेक, पूजा, लघुरुद्र, आरती, नैवद्य, ब्राह्मण–सुवासिनी भोजन, अन्नदान वगैरे विधी दररोज यथासांग करण्यांत आले. मंदिरांत तीन भक्तांच्या श्रीसत्यनारायण पूजा झाल्या.

**कीर्तन**:—संस्थान गवई यांचीं दोन कीर्तनें या महिन्यांत झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार ह. भ. प. गंगाबाई देशमुख–नाशिक, ह. भ. प. शंकरस्वामी पुणें यांचीं कीर्तनें समाधी मंदिरांत झालीं.

**नवलविशेष**:—आषाढ शु॥ ११ निमित्त समाधीस मंगलस्नान व रात्रौ श्रींच्या पालखीची मिरवणूक झाली.

श्री. हरकूशेट भजन मंडळी, रहाता यांनीं भजनाची हजेरी दिली. कु. कृष्णाबाई धुरंधर मुंबई यांनीं संगीत भजनें म्हटलीं. श्री. दादू गंगाराम (चोखामेळा) यांनीं भजनें दिलीं. सभामंडपाचें बांधकाम चालू आहे.

सेक्रेटरी

**श्रीसाई संस्थान, शिरडी.**

## गुरुपौर्णिमा उत्सव–

श्रीसच्चीदानंद सद्गुरु, आधुनिक संतचूडामणि श्रीसाईनाथ महाराज, संस्थान शिर्डी ता० कोपरगांव. जि० अहमदनगर यांचा श्रीगुरुपौर्णिमा उत्सव ता. २८–७–५० मिती आषाढ शु० १४ शके १८७२ शुक्रवार या दिवशीं सुरू होऊन ता. ३०–७–१९५० मिती आषाढ व० १ शके १८७२ रविवार या रोजीं समाप्त झाला. उत्सवाचा सोहळा तीन दिवसपर्यंत चाललेला होता. उत्सवास हिंदुस्थानांतील लांब-दूरच्या निरनिराळ्या शहरांतून बराच भक्तगण आपापल्या कुटुंबीयांस घेऊन श्रींचे दर्शनास आला होता.

ता. २८-७-५० रोजीं नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त, सायंकाळीं ह. भ. प. केशवदास बुवा, सिकंदराबाद यांचें श्रीमंदिरांत सुश्राव्य कीर्तन झालें. रात्रौ ८ ते १० पर्यंत श्री. पंडित जगन्नाथ बुवा सुरतकर यांचें संगीत गायन व भजन झालें. रात्रौ ९ ते ११ पर्यंत श्रींचे पालखीची गांवांतून सर्व भक्तगणासहवर्तमान मिरवणूक निघाली होती.

ता. २९-७-१९५० रोजीं शनिवारीं ( हा मुख्य गुरुपौर्णिमेचा दिवस ) श्रीचें समाधीस भक्तांकडून अभिषेक, पूजा, अर्चन, लघुरुद्र वगैरे धर्मकृत्यें झालीं. नंतर दहा वाजतां समाधीस मंगलस्नान घालण्यांत आलें. स्नानाच्या वेळीं सर्व भक्तांस त्यांत भाग घेतां यावा म्हणून, पांच बायका व पांच पुरुष असा पांच पांच माणसांचा गट समाधीवर आळीपाळीनें सोडून देण्यांत येत असे. त्यामुळें स्नानाच्या वेळचें काम गडबडाट वगैरे न होतां शिस्तशीर चाललें होतें. नंतर वस्त्रार्पण पुष्पार्पण झाल्यावर माध्यान्न आरतीस सुरवात झाली. आरतीच्या वेळीं समाधी मंडपांत फारच गर्दी झाली होती व कांहीं भक्तांस बाहेर उभें राहूनच आरतीच्या वेळच्या त्या भव्य सोहळ्याचा आनंद लुटावा लागला. नंतर तीर्थप्रसाद वगैरे वाटण्यांत आला. संध्याकाळीं श्री. ह. भ. प. गोपिचंदबुवा बोरकर यांचें कीर्तन झाल्यावर सायं आरतीही मोठ्या थाटामाटांत झाली.

रात्रीं गांवांतून श्रींच्या रथाची मिरवणूक काढण्यांत आली. मिरवणुकीचे वेळीं नकला, गारुड व पोवाडे वगैरे मनोरंजनाचे कार्यक्रम झाल्यावर श्रींचे मंदिरांत रात्रभर मुंबईचे प्रसिद्ध गवई श्री. कृष्णराव चोणकर यांचें गायन व पुण्याच्या श्री साईदास मंडळाचें गायन वादन झालें.

[ वरील श्रीसाईदास मंडळ दरवर्षी गुरुपौर्णिमेच्या उत्सवास शिरडीस येत असतें व आपले निरनिराळे कार्यक्रम त्या दिवशीं रात्रभर करून श्री साईचें तसेंच भक्तजनांचीं मनें रंजविण्याचें काम करीत असतें. श्रीसाई त्यांच्या या कामाचें योग्य फळ देतील यांत शंका नाहीं. तरी या मंडळाचा असाच उत्कर्ष होवो अशी साईचरणीं विनंति. ]

श्रीसाईदास मंडळाच्या व इतर कलाकारांनीं भाग घेतला होता ते श्री. माधवराव जोशी ( गायन ), श्री. राजाराम देशपांडे ( हार्मोनियम ), श्री. रायरीकर ( ऑर्गन ), श्री. रामचंद्र बोडके ( फ्ल्यूट ), श्री. जगन्नाथ वडसे ( फ्ल्यूट ), श्री. लाला गंगावने ( तबला ), श्री. मुरलीधर काशिनाथ सोनवणे, नाशिक ( सनई ), राजाराम सीताराम शेवाळे ( तबला ), श्री. मनोहर पनवेलकर, ( सनई ), श्री. दामुअण्णा बेलापूरकर ( सनई ), श्री. सुगंधाबाई सिन्नरकर ( गायन ), श्री. वेणुबाई शिर्डी ( गायन ), श्री. दत्तोपंत जळगांवकर ( तबला ), श्री. रंगनाथ बेलापूर ( तबला ), श्री. शंकरराव नगरकर ( सनई ), श्री. जनार्दन गोणेरे, शिर्डी यांनीं स्वतः रचलेला श्रीसाईबाबांचा पोवाडा म्हणून दाखविला.

वरील कलावंत मंडळींनीं श्रीची रात्रभर सेवा केली. नेल्लोर भजन मंडळींनीं तेलगु भाषेंत भजन म्हणून तेलगु न येणाऱ्यांचेंही मन आकर्षण करून घेतलें होतें.

शिरडींत नवीन बांधीत असलेल्या विजेच्या पावरहाऊसमुळें या उत्सवास ग्यासच्या बत्त्या न वापरतां विजेच्या वत्त्या वापरल्या होत्या त्यामुळें उत्सवास विशेष शोभा आली होती.

ता. ३०-७-५० रविवार सकाळीं ११ ते १ पर्यंत संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांचें काला कीर्तन झालें. नंतर दहीं हंडी कार्यक्रमानंतर श्रींची माध्यान्न आरती

झाली व तीर्थप्रसाद होऊन उत्सव समाप्त झाला. उत्सवास संस्थानची चालक मंडळी, ऑ. सेक्रेटरी, ऑ. खजिनदार, ऑ. ट्रस्टी, ऑ. प्रेसिडेंट वगैरेंनीं हजर राहून देखरेख करीत होते.

याप्रमाणें गुरुपौर्णिमा उत्सव फारच उत्तम रीतीनें पार पडला.

सेक्रेटरी
**श्री साई संस्थान**

## माहे ऑगष्ट १९५०

या महिन्यांत बाहेरगांवचे व शिरडीच्या आजुबाजूचे बरेच भक्तगण श्रीसाई-समाधी दर्शनास येऊन गेले.

**देणगीः**—निरनिराळ्या ठिकाणच्या एकूण १८ भक्तांकडून या महिन्यांत देणगी दाखल निरनिराळ्या कापडाच्या सोन्या-चांदीच्या वगैरे वस्तू आल्या आहेत.

श्री. अनंत बाबूराव साळवी दादर-मुंबई यांच्याकडून संस्थानास हार्मोनियम-हातपेटी देणगी दाखल मिळाली आहे.

**धर्मकृत्यः**—श्रीसंस्थान कमिटीतर्फे अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन, अन्नदान वगैरे विधी दररोज यथासांग केलें जात होते.

**कीर्तनः**—संस्थान गवई यांचीं या महिन्यांत, आषाढ, व० ॥ ११, श्रीसावतामाळी पुण्यतिथि, १५ ऑगष्ट स्वातंत्र्यदिनीं व श्रावण शु० ॥ ११ अशीं एकूण चार कीर्तनें झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री ह. भ. प. अमरदास, मु० चिवळी ता० एरंडोल, श्री. ह. भ. प. शंकरस्वामी, पुणें व श्रीमती ह. भ. प. पद्मावतीबाई देशपांडे, मुंबई यांचीं तीन कीर्तनें समाधीमंदिरांत झालीं.

**नवलविशेषः**—श्री. रघुनाथ बुवा पंडित मु० ग्वाल्हेर यांनीं श्रीपुढें गायनाची हजेरी दिली.

१५ ऑगष्टच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त कीर्तन वगैरे करून छोटासा उत्सवच साजरा करण्यांत आला. सभामंडपाचें बांधकाम चालू आहे.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

सेक्रेटरी
**श्रीसाई संस्थान, शिर्डी**

# श्री साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र ( मराठी ) .... ... | ७—०—० |
| २ | सच्चरित्र ( इंग्रजी ) .... .... | ४—०—० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी .... | ०—२—० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] .... | ०—८—० |
| ५ | सगुणोपासना .... .... .... | ०—३—० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक ( इंग्रजी ) .... .... | १—४—० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर**

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक :—**डॉ. के. भ. गव्हाणकर** यांनीं, काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक :—**के. एन्. सापळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, **मुंबई ४**